शुक्रवार, ३ मार्च २०२३

# राम प्रहर

• वर्ष १५ • अंक २२४
www.ramprahar.com

• पाने ८ • किंमत ₹२ • रायगड

## अंतरंग

अलिबागेत चाकूचा धाक दाखवून दाम्पत्याला लुटले/२
टेम्पो अंगावर पडून वीटभट्टी कामगाराचा जागीच मृत्यू/५
राष्ट्रीय कराटे स्पर्धेत महाडच्या खेळाडूंची दमदार कामगिरी/८

### ईशान्य भारत नव्या दिशेने वाटचाल करतोय -पंतप्रधान



**नवी दिल्ली** : पूर्वी ईशान्य भारताची एवढी चर्चा होत नसे. झालीच तर ती दहशतवाद, हिंसाचारासाठी होत असते, परंतु आता हा भाग नव्या दिशेने वाटचाल करतोय, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी (दि. २) येथे केले. ईशान्य भारतातील त्रिपुरा, नागालँड विधानसभा निवडणुकीत भाजप व सहकारी पक्षांनी विजय साकारला आहे, तर मेघालयमध्ये स्थानिक पक्ष नॅशनल पीपल्स पक्ष (एनपीपी)ने ठरविल्यास तेथेही भाजप युतीची सत्ता येऊ शकते. या पार्श्वभूमीवर भाजपच्या दिल्ली येथील मुख्यालयात ईशान्य भारतातील विजयाचे शिल्पकार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा सत्कार करण्यात आला. त्या वेळी ते सत्काराला उत्तर देत होते. त्यांनी भाजप युतीला साथ दिल्याबद्दल मतदारांचे आभार मानले आणि विकासाचे चक्र सुरूच राहिल, अशी ग्वाही दिली.

# ईशान्य भारतात भाजपची बाजी

## त्रिपुरात स्पष्ट बहुमत, नागालँडमध्येही युतीचे वर्चस्व



**आगरतळा : वृत्तसंस्था**

ईशान्य भारतातील त्रिपुरा, नागालँड आणि मेघालय या तीन राज्यांतील विधानसभा निवडणुकीचा निकाल गुरुवारी (दि. २) जाहीर झाला. त्रिपुरामध्ये भाजपने पूर्ण बहुमत प्राप्त केले आहे. नागालँडमध्येही भाजप आणि सहयोगी नॅशनलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव्ह पक्ष (एनडीपीपी) सरकार स्थापन करणार आहे, तर मेघालयमध्ये परिस्थिती त्रिशंकू आहे. तिथे नॅशनल पीपल्स पक्ष (एनपीपी) सर्वांत मोठा ठरला आहे.

त्रिपुरामध्ये सत्ताधारी भाजप आणि आयपीएफटी युतीला बहुमत मिळाले आहे. सायंकाळपर्यंत हाती आलेल्या कलानुसार भाजप युती ६० पैकी ३३ जागांवर आघाडीवर होती. डावे आणि काँग्रेस आघाडीला १४ जागा मिळाल्या, तर टीएमपीने १२ जागी यश मिळविले.

नागालँडमध्ये भाजप आणि एनडीपीपी युतीने बाजी मारली. त्यांनी ६० पैकी ३७ जागांवर कब्जा केला. मुख्य विरोधी पक्ष नागा पीपल्स फ्रंटला (एनपीएफ) केवळ दोन जागांवर समाधान मानावे लागले, तर इतर पक्ष २१ जागांवर पुढे होते.

मेघालयमध्ये एका उमेदवाराच्या मृत्यूमुळे विधानसभेच्या ६० पैकी ५९ जागांसाठी मतदान झाले. येथे एनपीपी २६ जागांवर आघाडी घेऊन सर्वांत मोठा पक्ष ठरला. तृणमूल काँग्रेस व काँग्रेस प्रत्येकी पाच, भाजप दोन, तर इतर पक्षांच्या खात्यात २१ जागा दिसत होत्या. दरम्यान, मुख्यमंत्री कोनराड संगमा यांनी भाजपच्या पाठिंब्यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याशी संपर्क साधल्याचे वृत्त आहे.

# मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण उत्कृष्ट दर्जाने लवकरात लवकर व्हावे

## आमदार प्रशांत ठाकूर यांनी वेधले शासनाचे लक्ष

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम उत्कृष्ट दर्जाने आणि लवकरात लवकर होण्याबरोबरच या महामार्गावर प्रत्येक ५० ते १०० किमी अंतरावर ट्रॉमा केअर सेंटर उभारणी झाली पाहिजे यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात तारांकित प्रश्न दाखल केला. याद्वारे त्यांनी या महत्त्वपूर्ण विषयावर शासनाचे लक्ष वेधले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी दाखल केलेल्या तारांकित प्रश्नात म्हटले की, मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरण आणि रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम डिसेंबर २०२२पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना या आश्वासनाची पूर्तता करण्यास एनएचएआय अपयशी ठरल्याने तसेच १२ वर्षांपासून या महामार्गाचे काम प्रलंबित असल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या या कामांबाबत उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे जानेवारी २०२३मध्ये निदर्शनास आले आहे. पनवेल ते इंदापूरमधील सुरुवातीच्या ० ते ४२ किमीच्या पट्ट्याचे काम पूर्ण झाल्याचे प्रतिज्ञापत्र एनएचएआयने न्यायालयासमोर सादर केले असून याच मार्गादरम्यानच्या ४२.३ किमी ते ८४.६ किमीच्या रस्त्याचे कंत्राट देण्यात आलेल्या मे. कल्याण टोल इन्फ्रा लि. या कंपनीने कोणतेही काम केलेले नाही. या महामार्गाच्या कामाची जबाबदारी ही राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाची असून काम मोठ्या प्रमाणात अपूर्ण असतानाही तसेच शासनाकडून या विषयी प्राधान्याने कोणतीही कार्यवाही होत नसतानाही या संपूर्ण टप्प्याचे काम मे २०२३पर्यंत पूर्ण होईल अशा स्वरूपाचे प्रतिज्ञापत्र मुख्य सरकारी वकिल यांनी न्यायालयात सादर केले आहे तसेच या महामार्गाचे काम अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे झाले असून या रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे येथे अपघातांच्या प्रमाणात वाढ झाली आहे. असे असताना या महामार्गावर अपघातग्रस्तांना वैद्यकीय सेवा तत्काळ मिळण्याबाबत प्रत्येक ५० किंवा १०० किमी अंतरावर एक ट्रामा सेंटर उभारण्याची आवश्यकता आहे.

**विधिमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशन**



### प्रत्येक ५० ते १०० किमी अंतरावर ट्रॉमा केअर सेंटर उभारण्याचीही मागणी

या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून महामार्गाची प्रलंबित कामे तत्काळ पूर्ण करून निकृष्ट काम करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच ट्रामा केअर सेंटर उभारणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असा सवाल आमदार प्रशांत ठाकूर यांनी केला.

या प्रश्नावर राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी दिलेल्या लेखी उत्तरात सांगितले की, मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण आणि रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम डिसेंबर २०२२पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित असताना या आश्वासनाची पूर्तता करण्यास एनएचएआय अपयशी ठरल्याने तसेच १२ वर्षांपासून या महामार्गाचे काम प्रलंबित असल्याने राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या या कामांबाबत उच्च न्यायालयाने तीव्र नाराजी व्यक्त केल्याची बाब खरी आहे. पनवेल ते इंदापूरमधील सुरुवातीच्या ० ते ४२ किमीच्या पट्ट्याचे काम पूर्ण झाल्याचे प्रतिज्ञापत्र एनएचएआयने न्यायालयासमोर सादर केले असून याच मार्गादरम्यानच्या रस्त्याचे कंत्राट देण्यात आलेल्या मे. कल्याण टोल इन्फ्रा लि. या कंपनीने काम केलेले नसल्याची बाब अंशत: खरी आहे. त्या अनुषंगाने किमी ४२.३ ते किमी ८४.६ लांबीमध्ये असलेला दोन लेनचा रस्ता वाहतुकीच्या दृष्टीने रस्त्याचा खराब भाग डांबरीकरणाने दुरुस्त करण्याचे मंजूर असून त्या संदर्भातील कामे प्रगतिपथावर आहेत. **(पान २ वर..)**

# पुणे पोटनिवडणुकीचा संमिश्र निकाल

## जगताप, धंगेकर विजयी



**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील पोटनिवडणुकीचा निकाल गुरुवारी (दि. २) जाहीर झाला असून चिंचवडमध्ये भाजपच्या अश्विनी जगताप, तर कसबा पेठमध्ये काँग्रेसचे रवींद्र धंगेकर विजयी झाले आहेत. अनुक्रमे लक्ष्मण जगताप आणि मुक्ता टिळक यांच्या निधनामुळे या ठिकाणी पोटनिवडणूक झाली.

चिंचवडमध्ये भाजप आमदार दिवंगत लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप यांना पक्षाने उमेदवारी दिली होती. त्या तब्बल ३६ हजार ९१ मतांनी विजयी झाल्या. त्यांना एक लाख ३५ हजार ४३४ मते मिळाली. त्यांचे प्रतिस्पर्धी राष्ट्रवादी काँग्रेसचे विठ्ठल (नाना) काटे यांना ९९ हजार ३४३ मते, तर अपक्ष उमेदवार राहुल कलाटे यांना ४४ हजार ८२ मते पडली. 'मी हा विजय सर्वसामान्य जनतेला आणि लक्ष्मण जगताप यांना समर्पित करते. भाजपचे नेते, कार्यकर्ते आणि जनतेला माझ्या पाठिशी उभे राहिल्याबद्दल धन्यवाद देते. लोकांसाठीची लक्ष्मण जगताप यांची अपुरी राहिलेली कामे पूर्ण करण्याचा मी प्रयत्न करणार आहे, अशी प्रतिक्रिया अश्विनी जगताप यांनी विजयानंतर दिली.

कसबा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी ११ हजार ४० मतांनी विजय मिळविला. धंगेकर यांना ७३ हजार १९४ मते, तर भाजपच्या हेमंत रासने यांना ६२ हजार २४४ मते मिळाली.

# कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांचा परीक्षांवरील बहिष्कार मागे

### शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांची माहिती



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील महाविद्यालयीन शिक्षकांच्या विविध मागण्यांबाबत सकारात्मक चर्चा झाली. यामुळे महाविद्यालयीन शिक्षकांनी बारावीच्या पेपर तपासणीवर टाकलेला बहिष्कार मागे घेतल्याने निकाल वेळेत लागणार असल्याची माहिती शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी गुरुवारी (दि. २) मुंबई येथे पत्रकार परिषदेत दिली.

मंत्री केसरकर यांनी सांगितले की, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांच्या अडचणीबाबत व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत सकारात्मक चर्चा झाली होती. आज पुन्हा महासंघाच्या पदाधिकाऱ्यांसोबत झालेल्या चर्चेत शासनाने विद्यार्थ्यांच्या हिताच्या दृष्टीने सकारात्मक निर्णय घेतला आहे. १ नोव्हेंबर २००५पूर्वी विनाअनुदानित तसेच अंशत: अनुदानावरील नियुक्त शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत शासन सकारात्मक असून याबाबत उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त समिती योग्य निर्णय घेणार आहे. जुन्या पेन्शन योजनेसंदर्भात उर्वरित शिक्षक, राज्य शासकीय कर्मचारी यांच्याबाबत राज्य शासनाच्या धोरणानुसार निर्णय घेण्यात येणार आहे. शासकीय कर्मचाऱ्यांसाठी असलेली १०, २०, ३० वर्षांची आश्वासित प्रगती योजना शिक्षकांनाही लागू केली जाईल. याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाला पाठविला आहे तसेच राज्यातील आयटी विषयाच्या नियुक्तीला मान्यताप्राप्त आयटी शिक्षकांच्या २१४ पदांना मान्यता दिली आहे. त्यांच्या वेतनाबाबत अधिवेशन संपल्यानंतर वित्त विभागासोबत बैठक घेऊन निर्णय घेतला जाईल, असेही मंत्री केसरकर यांनी सांगितले.

## निवडक

### राष्ट्रपतींद्वारे होणार मुख्य निवडणूक आयुक्तांची नियुक्ती

**नवी दिल्ली** : निवडणूक आयुक्तांच्या नेमणुकीसंदर्भात गुरुवारी (दि. २) सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. मुख्य निडणूक आयुक्त आणि इतर निवडणूक आयुक्तांची नेमणूक पंतप्रधान, विरोधी पक्षनेते आणि सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश यांचा समावेश असलेल्या समितीच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतींनी करावी, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे.

### अदानी-हिंडेनबर्ग प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती गठीत

**नवी दिल्ली** : अदानी-हिंडेनबर्ग प्रकरणाच्या चौकशीसाठी सर्वोच्च न्यायालयाकडून सहा जणांची समिती गठीत करण्यात आली आहे. निवृत्त न्यायमूर्ती अभय सप्रे यांच्या अध्यक्षतेखालीला समितीत ओ. पी. भट्ट, के. वि. कामथ, इन्फोसीसचे सहसंस्थापक आणि 'आधार'चे प्रवर्तक नंदन नीलकेणी, जस्टिस देवधर आणि सोमशेखर सुंदरेशन यांचा समावेश आहे. या प्रकरणाचा अहवाल दोन महिन्यांत सादर करावयाचा आहे.

# पनवेल रेल्वेस्थानकात चिमुकलीवर बलात्कार

## काही तासांमध्ये नराधम ताब्यात




**पनवेल : वार्ताहर**

पनवेल रेल्वेस्थानक परिसरात तीन वर्षीय मुलीवर एका नराधमाने बलात्कार केल्याची घटना गुरुवारी (दि. २) सकाळी उघड झाली. या प्रकरणी पनवेल रेल्वे पोलिसांनी तत्काळ कारवाई करीत अवघ्या काही तासांत आरोपीला ताब्यात घेतले आहे.

पनवेल स्टेशनमधील फलाटावरील बाकड्याजवळ पीडित मुलगी आईसह झोपली होती. आई लघुशंकेसाठी गेली असता अज्ञाताने त्यांच्या चिमुकलीला उचलून नेले. या मुलीचा शोध घेतला असता ती जवळील सिमेंट रिलपरच्या बाजूला निर्वस्त्र व बेशुद्ध अवस्थेत आढळली. तिला तत्काळ स्थानिक रेल्वे पोलिसांच्या मदतीने उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

पोलिसांनी या गंभीर घटनेची दखल घेऊन विविध पथके आरोपीच्या शोधात रवाना केली होती. तांत्रिक विश्लेषण तसेच गुप्त बातमीदाराकडून आरोपी हा बाटल्या गोळा करणारा व्यक्ती असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तपासादरम्यान रेल्वे सुरक्षा बल जवान आनंदकुमार यांना जुईनगर रेल्वेस्थानक येथे आरोपी मुकेशकुमार बाबू खाँ साह (वय ३०) दिसून आला. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्याला तत्काळ अटक करण्यात आली.

# राज्यात अवकाळी पावसाची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील काही भागांत ४ ते ६ मार्चदरम्यान पावसाची शक्यता आहे. कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असल्याने राज्यात उत्तर महाराष्ट्र, मराठवाड्यात काही ठिकाणी, उत्तर कोकण आणि विदर्भात पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे.



मार्च ते मे महिन्यात कडाक्याचे ऊन पडेल, असे हवामान विभागाने म्हटले होते. आता राज्यात तीन दिवस पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मागील काही वर्षात तापमानात होत असलेली वाढ चिंतेचा विषय ठरतेय. यंदाच्या फेब्रुवारी महिन्यात पारा चाळीशीजवळ पोहचला होता. त्यामुळे यंदा उष्णतेची लाट येईल, असा अंदाज वर्तविण्यात आला होता, पण कडक उन्हाळा सुरू होण्याआधीच पाऊस हजेरी लावण्याची शक्यता आहे.

विदर्भात ६ मार्च रोजी सर्वत्र पावसाचा अंदाज आहे. ५ मार्च रोजी नागपूर, वर्धा, चंद्रपूर, अमरावती, अकोला आणि बुलढाण्यात तुरळक ठिकाणी पाऊस कोसळू शकतो. उत्तर कोकणात तसेच औरंगाबादेत तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राकडून व्यक्त करण्यात आला आहे. तत्पूर्वी ४ मार्च रोजी काही ठिकाणी पाऊस पडू शकतो. हा पाऊस अतिशय कमी प्रमाणात होणार असल्याचा अंदाज असल्याने उकाड्यापासून दिलासा मिळणार नाही. उलट आणखी त्रास होण्याची भीती आहे.

# शासकीय कार्यालये सलग चार दिवस राहणार बंद

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील शासकीय कार्यालये ४ ते ७ मार्च या कालावधीत सलग चार दिवस बंद राहणार आहेत. त्यामुळे हे चार दिवस शासकीय कार्यालयांमधील व्यवहार ठप्प होणार आहेत.

४ मार्च रोजी शनिवार आणि ५ मार्च रोजी रविवार आहे. हे दोन सप्ताहिक सुटीचे दिवस आहेत. सोमवारी ६ मार्च रोजी होळी आहे. या दिवशी जिल्हाधिकाऱ्यांनी स्थानिक सुटी जाहीर केली आहे, तर ७ मार्च रोजी धुळवडीची सुटी आहे. त्यामुळे येत्या शनिवार ते मंगळवार असे सलग चार दिवस शासकीय कार्यालये बंद राहणार आहेत.



# भाजपाची महाविजय २०२४ अभियान संयोजन समिती घोषित

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

पुढील वर्षी होणाऱ्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांच्या तयारीच्या दृष्टीने भारतीय जनता पार्टीने महाविजय २०२४ अभियान जाहीर केले असून या अभियानाची संयोजन समिती प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी घोषित केली. या अभियानाचे प्रदेश संयोजक म्हणून आमदार श्रीकांत भारतीय यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

संयोजन समितीच्या सदस्यपदी प्रदेश उपाध्यक्ष सुनील कर्जतकर, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवीन्द्र अनासपुरे, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक, प्रदेश सचिव श्वेता शालिनी, अरविंद निलंगेकर, प्रदेश मुख्यालय सहसचिव संजय फांजे, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, मुंबई भाजपा सरचिटणीस संजय उपाध्याय यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

२०२४च्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत संपूर्ण विजय हे लक्ष्य ठेवून या अभियानाची आखणी करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, मुंबई अध्यक्ष आमदार आशीष शेलार हे या समितीचे विशेष निमंत्रित आहेत.

दरम्यान, यंदा राज्यात होणाऱ्या कॅन्टोन्मेंट निवडणुकांसाठी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी निवडणूक प्रमुखांची घोषणा केली आहे. यात पुणे आमदार सुनील कांबळे, शिवाजीनगर आमदार सिद्धार्थ शिरोळे, देहू माजी आमदार संजय भेगडे, देवळाली बाळासाहेब सानप, अहमदनगर महेंद्र गंधे, छत्रपती संभाजीनगर संजय केनेकर, नागपूर डॉ. राजीव पोतदार आहेत.

# चाकूचा धाक दाखवून चौघांनी दाम्पत्याला लुटले

## अलिबाग रोहिदास नगर येथील घटना

**अलिबाग : प्रतिनिधी**

चाकूचा धाक दाखवून घरात घुसलेल्या चौघांनी घर लुटल्याची घटना अलिबाग शहराच्या मध्यवर्ती भागात घडली. त्यामुळे शहरात घबराट पसरली आहे.

अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत २८ फेब्रुवारी दुपारी सव्वा बाराच्या सुमारास कांचन इन्क्लेव्ह सोसायटी, रोहीदास नगर, चेंढरे तालुका अलिबाग येथील वृध्द दांम्पत्याच्या राहते घरी ही घटना घडली. फिर्यादी यांची पत्नी व नातू असे घरी होते.

यावेळी घराच्या उघड्या दरवाजा वाटे अज्ञात चार इसमांनी प्रवेश केला. ओरडायचे नाही, अशी दमदाटी करून मानेला चाकू लावून हातपाय चिकटपट्टीने बांधले. तसेच मुलगा यांचे बेडरुममधील सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व मोबाईल फोन असा पन्नास हजार किमतीचा मुद्देमाल फिर्यादी यांचे संमती शिवाय, लबाडीच्या हेतूने, जबरी चोरी करून चोरून नेण्यात आला.

याबाबत अलिबाग पोलीस ठाणे येथे गु. र. नं. ५९/२०२३ भा.दं.वि.क. ३९२, ४५२, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक अभिजित पाटील हे करीत आहेत.

# रोहा पोलिसांची मोठी कारवाई; तब्बल १८०० लिटर मद्य जप्त

**धाटाव : प्रतिनिधी**

काही दिवसांपासून रोहा तालुक्यात गावठी दारूची आयात वाढलेली दिसून येत आहे. ही दारू इतकी घातक आहे की गेल्या काही महिन्यांमध्ये ही दारू पिऊन काही लोकांचा बळी सुद्धा गेलेला पाहायला मिळाला. परंतु ही दारू कुठून येत होती याचा छडा काही लागत नव्हता रोहा पोलिसांनी याकडे बारकाईने लक्ष देत. रोहा तालुक्यातील दीव, कोपरी, न्हावे येथील गावठी दारूच्या हातभट्टीच्या अड्ड्यांचा शोध घेत. तेथे गुरुवारी (दि.२) सकाळच्या सुमारास प्रोविजन रेड केली. या कारवाईत तब्बल १८०० लिटर सुमारे ३५००० रुपयांची गावठी दारू जप्त करण्यात आली. त्या दारूचा जागीच नायनाट करण्यात आला. आणि ते बेवारीस अड्डे संपूर्णतः नष्ट करण्यात आले.

ही धडक कारवाई रोहा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रमोद बाबर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक काजरोळकर, पोलीस हवालदार गदमले, पो. ना. पाटील यांनी केली. घटनेचा पुढील तपास रोहा पोलीस करत आहे.



# कर्णबधिरता निवारण सप्ताह

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

३ मार्च या जागतिक कर्णबधिरता दिनानिमित्त जिल्हा रुग्णालय रायगड अलिबाग तसेच रायगड जिल्हा परिषदेमार्फत रायगड जिल्ह्यातील सर्व उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र स्तरावर १ ते ८ मार्च या कालावधीमध्ये कर्णबधिरता निवारणाविषयी सप्ताहाचे आयोजन केले आहे.

सप्ताहामध्ये कानाविषयी विविध तपासण्या तज्ञांमार्फत करण्यात येत आहेत. कर्णबधिरतेविषयी जनजागृती होण्यासाठी शहरामध्ये विद्यार्थ्यांची प्रभातफेरी, पोस्टर्स व रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. कानाची तपासणी, कर्णबधिरते विषयी दिव्यांग प्रमाणपत्र वाटप होणार आहे.



**नवी दिल्ली : केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची ट्रान्स्पोर्ट भवन येथील कार्यालयात भेट घेत भारतीय कामगार चळवळीचे जनक नारायण मेघाजी लोखंडे व साहित्यिक नामदेव ढसाळ यांनी हायवे ऑफ डेव्हलपमेंट या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्ती प्रकाशनाबाबत वेळ मिळावी याबाबतचे पत्र देण्यात आले. या वेळी सचिव संकेत भोंडवे व अन्य उपस्थित होते.**

# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त माणगावात स्वच्छता अभियान

**माणगांव : प्रतिनिधी**

श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त भारत देशाचे स्वच्छतादूत पद्मश्री महाराष्ट्र भूषण डॉ. श्री. आप्पासाहेब धर्माधिकारी व डॉ. श्री. सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा ता. अलिबाग यांच्या सौजन्याने माणगाव तालुक्यातील नगरपंचायत माणगांव, ग्रामपंचायत गोरेगाव, ग्रामपंचायत निजामपूर तसेच तळा तालुक्यातील नगरपंचायत तळा हद्दीत बुधवारी श्री सदस्यांनी ग्राम स्वच्छता अभियान कार्यक्रम राबवून श्रमदान करून स्वच्छता केली. त्यामध्ये माणगाव नगरपंचायत हद्दीमध्ये



१४४२ श्रीसदस्यांनी एकत्रित येत ६१ टन ओला व सुका कचरा, गोरेगाव ग्रामपंचायत हद्दीमध्ये ९५० श्रीसदस्यांनी एकत्रित येत ३७ टन ओला व सुका कचरा, निजामपूर ग्रामपंचायत हद्दीमध्ये ३२५ श्रीसदस्यांनी एकत्रित येत २४ टन सुका कचरा, तळा नगरपंचायत हद्दीमध्ये २०२ श्रीसदस्यांनी एकत्रित येत १९ टन ओला व सुका कचरा उचलला.

चारही गावांतून मिळून २९१९ श्रीसदस्यांनी श्रमदान करून एकूण १४१ टन इतका ओला व सुका कचरा उचलून चारही गावांची स्वच्छता केली. श्रीसदस्यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. श्री सदस्यांनी राबविलेल्या चारही गावांतील या स्वच्छता अभियान कार्यक्रमात विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सामाजिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी, नगरपंचायत, ग्रामपंचायत कार्यालयाचे सफाई कामगार आदी सहभागी झाले होते.

सकाळपासून डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या श्रीसदस्यांनी स्वच्छतेची साधने घेऊन साफसफाई केली. या स्वच्छता अभियानात माणगाव, गोरेगाव, निजामपूर, तळा या चारही गावात मिळून एकूण २९१९ श्री सदस्यांनी सरकारी कार्यालयांचा परिसर, नगर पंचायतीचे प्रांगण, ग्रामपंचायत परिसर, पोलीस ठाण्याचा परिसर, प्राथमिक आरोग्य केंद्र, बसस्थानक, जिल्हापरिषद शाळा, शहरातील प्रमुख रस्ते, स्मशानभूमी यांची साफसफाई करण्यात आली. यामध्ये रस्त्यांच्या दुतर्फा वाढलेले गवत, कचरा व प्लास्टिक बाटल्या उचलून शहराच्या स्वच्छतेचे काम स्वयंस्फूर्तिने व शिस्तबद्ध केले.

पान १ वरुन

# मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण उत्कृष्ट दर्जाने लवकरात लवकर व्हावे

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या अखत्यारीत चौपदरीकरणाचे उर्वरित किमी ४२ ते किमी ८४ या लांबीचे काम १८ महिन्यांमध्ये पूर्ण करण्याचे नियोजन आहे व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेल्या किमी ८४/०० ते किमी ४५०/१७० या लांबीचे काम डिसेंबर २०२३पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

मुंबई-गोवा महामार्गाच्या लांबीतील पावसाळ्यात पडलेले खड्डे डिसेंबर २०२२पूर्वी भरण्यात आले असून त्यानंतरही चालू कामामुळे, अवजड मशिनरी फिरत असल्याने पडलेले खड्डे व वळण रस्त्यावरील वाहतूक वर्दळीमुळे पडणारे खड्डे भरण्याचे काम नियमितपणे सुरू आहे. महामार्गावरील इंदापूर ते करोडी परशुराम घाट (किमी ८४/०० ते किमी २०५/४००) या राष्ट्रीय महामार्ग विभागाकडे असलेल्या लांबीमध्ये किमी १२६.५०० महाड येथे ट्रामा सेंटर उपलब्ध आहे तसेच भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणातर्फे खारपाडा टोलनाका येथे एक व सुकेळी घाट येथे एक रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याशिवाय अपघातग्रस्तांना वैद्यकीय सेवा तत्काळ मिळण्याबाबत प्रत्येक ५० किंवा १०० किमी अंतरावर एक ट्रामा सेंटर उभारण्याची गरज असल्याचेही मंत्री रवींद्र चव्हाण यांनी नमूद केले.

# होळी सणानिमित्त सोमवारी स्थानिक सुटी जाहीर -जिल्हाधिकारी

**अलिबाग : प्रतिनिधी**

शासकीय ठराव, राजनैतिक व सेवा विभागाच्या १६ जानेवारी १९५८च्या शासन निर्णयान्वये रायगड जिल्ह्यातील महसूल हद्दीमध्ये शासनाच्या सर्व खात्यामधील कार्यालयांकरिता तीन स्थानिक सुट्या जाहीर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत.

त्यानुसार जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांनी सन-२०२३ या वर्षाकरिता होळी सणानिमित्त सोमवार, ६ मार्च २०२३ रोजी स्थानिक सुटी जाहीर केली आहे.


MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026418** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-8/2023-2024 RFx E-Tender for Hiring of MMV Vehicle at EHV Lines Maintenance S/dn. Panvel-I for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022- 2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026419** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-9/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of MMV Vehicle at EHV Lines Maintenance S/dn. Panvel-II for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026422** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-10/ 2023-2024 RFx E-tender for Hiring of LMV Vehicle at EHV Lines Maintenance S/dn Panvel-II for period 01.04.2023 to 31.03.2024 **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026420** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-11/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of LMV Vehicle at EHV Substation Maintenance S/Dn Panvel for period 01.04.2023 to 31.03.2024 **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026421** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-12/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of MMV Vehicle at EHV Substation Maintenance S/Dn Panvel for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026423** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-13/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of LMV Vehicle at 100kV Khopoli Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026424** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-14/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of LMV Vehicle at 100kV Taloja Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026425** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-15/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of LMV Vehicle at 100kV Jite Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026428** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-16/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of LMV Vehicle at 100kV Thal Substation for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000026426** **Tender No.** EE/EHV (O&M)/DN/PNL/ e-Tender-17/ 2023-2024 RFx E-Tender for Hiring of LMV Vehicle at 100kV Patalganga & Bhokarpada Substations for period 01.04.2023 to 31.03.2024. **Tender Amount Limited to:** Rs. 6,00,000/- **EMD:** Rs. 6,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 03.03.2023, 18:00 Hrs to 10.03.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 10.03.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 13.03.2023 at 11:00 Hrs (If possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची बांधिलकी

# दिव्यांगास मोफत व्हीलचेअर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दिव्यांग अनिकेत अनंत चौगुले यास मोफत व्हीलचेअर देण्यात आली आहे. भाजपच्या सेल्फी विथ लाभार्थींचे प्रदेश संयोजक वर्षा भोसले यांच्या हस्ते अनिकेत चौगुले याला या व्हील चेअरचे वाटप बुधवारी (दि. १) करण्यात आले आहे.

पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील रामशेठ ठाकूर विकास मंडळ सभागृहात झालेल्या या वाटपावेळी महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, पनवेल शहर अध्यक्ष वर्षा नाईक, माजी उपमहापौर चारुशिला घरत, जिल्हा समन्वयक संध्या शारबिन्द्रे, जिल्हा चिटणीस प्रिया मुकादम, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, नीता माळी, सुलोचना कल्याणकर, पुजानी, सुशीला घरत, महिला मोर्चा शहर उपाध्यक्षा सुहासिनी केकाणे, सरचिटणीस सपना पाटील, कोषाध्यक्षा अदिती मराठे, सदस्या नीता मंजुळे, ज्येष्ठ नेत्या विठाबाई सावंत, आशा मुंडे, प्रेमा भोपी आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या २५पेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि आर्थिक परिस्थिती बेताची असलेल्या विद्यार्थ्यांना तसेच गोरगरीब व गरजूंना नेहमीच मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते.

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने दरवर्षी शैक्षणिक उपक्रम राबवून गरीब, गरजू विद्यार्थ्यांना मदतही करण्यात येते. यासोबतच कोरोना महामारीमुळे संपूर्ण जगावर मोठे संकट कोसळले. नोकरी धंदा व्यवसायावर संक्रात आली. या महामारीने जीव वाचवताना सर्वसामान्यांना पोटाच्या खळगीचा प्रश्न निर्माण झाला. अशा या भूतो न भविष्यतो संकटकालीन परिस्थितीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सचिव परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लाखो जणांना मदतीचा हात दिला होता.

## पनवेलमध्ये महिलांसाठी प्राचीन युद्धकला प्रशिक्षणाचा शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महिला स्वावलंबनासाठी पनवेल महापालिकेच्या माजी नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या वतीने जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी प्राचीन युद्धकला प्राथमिक प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण शिबिराचा शुभारंभ बुधवारी (दि. १) सामाजिक कार्यकर्त्या ज्योती कानिटकर यांच्या हस्ते करण्यात आला.

**रूचिता लोंढे यांचा उपक्रम**

महिला स्वावलंबनासाठी भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेविका रूचिता लोंढे यांनी पनवेल महापालिका प्रभाग क्रमांक १९ मधील महिलांसाठी मोफत लाठी-काठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजित केले आहे. लोकनेते दि. बा. पाटील शाळेच्या मैदानात मार्च ते मार्च या दरम्यान हे प्रशिक्षण शिबिर होणार आहे. यंदाचे या शिबिराचे दुसरे वर्ष असून यामध्ये वर्षाहून अधिक वय असलेल्या मुली आणि महिलांना प्राचीन युद्धकलेचे प्राथमिक प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या वेळी आयोजक माजी नगरसेविका रूचिता लोंढे, कल्पना राऊत, अ‍ॅड. वृषाली वाघमारे, राजश्री वावेकर, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, पूजा लोंढे, स्वाती कोळी, संध्या समेळ, प्रांजली काणे, पल्लवी जोगळेकर यांच्यासह इतर महिला उपस्थित होत्या.









**खारघर : येथील मदरहूड हॉस्पिटलमध्ये रुग्णांची वाढती गर्दी पाहता पेशंटसह ओपीडीसाठी रूम वाढविण्यात आल्या आहेत. त्याचे उद्घाटन पनवेल महापालिकेच्या माजी उपमहापौर चारूशीला घरत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी मोना अडवाणी, प्रिया दळवी, सुनिता सूर्यवंशी यांच्यासह हॉस्पिटलची टीम उपस्थित होती.**

## नाल्यात पडलेल्या म्हशीची सुटका

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलजवळील करंजाडे येथील एक म्हैस नाल्यात अचानक पडल्याची घटना घडली. सिडको फायर ब्रिग्रेडच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पोहचून या म्हशीची सुखरूप सुटका केली.

करंजाडे आर ४ सेक्टर मधील उघड्या नाल्यात पडली. स्थानिकांनी या म्हशीला काढण्याचा प्रयत्न केला, पण त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. अखेर म्हैस नाल्यातून बाहेर काढण्यासाठी अग्निशमन दलाला पाचारण करण्यात आले. घटनास्थळी अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत जेसीबी आणि दोरखंड यांचा वापर करून त्या म्हशीची सुटका केली.

## परीक्षा केंद्रावर विद्यार्थ्यांना गुलाबपुष्प

### पनवेलमध्ये पत्रकार असोसिएशनचा उपक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

कोरोनानंतर यावर्षी पूर्वीप्रमाणे एसएससी परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार (दि. २)पासून दहावीची लेखी परीक्षा सुरू झाली. या वेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार असोसिएशनतर्फे परीक्षा देण्याऱ्या विद्यार्थ्यांना संघटनेतर्फे गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.







कोरोना महामारीमुळे अध्ययन प्रक्रियेसोबत परीक्षा पद्धतीदेखील प्रभावित झालेली होती. आता परिस्थिती पूर्वपदावर आल्यानंतर प्रथमच पूर्वीप्रमाणे परीक्षांचे आयोजन करण्यात आले आहे. परीक्षा कालावधीत विद्यार्थ्यांवर येणारा तणाव लक्षात दूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य पत्रकार असोसिएशनतर्फे पनवेल येथील विठोबा खंडाप्पा हायस्कूल या ठिकाणी परीक्षा देण्यास बसणाऱ्या विद्यार्थ्यांना संघटनेतर्फे गुलाबपुष्प देऊन त्यांचे स्वागत करण्यात आले व परीक्षेसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

या वेळी परीक्षा केंद्रावरील शिक्षक, कर्मचारी व बंदोबस्तावर तैनात पोलीस कर्मचारी यांनादेखील गुलाबपुष्प देऊन त्यांचेही स्वागत करण्यात आले. या वेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार असोसिएशनचे अध्यक्ष केवल महाडिक, कार्याध्यक्ष संतोष भगत, उपाध्यक्ष सुनील पाटील, सचिव संतोष सुतार, सदस्य मनोहर पाटील, राजपाल शेगोकार व मच्छींद्र पाटील आदी उपस्थित होते.

## 'कॉड'बाबत राष्ट्रीय हरित लवादा सकारात्मक

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्रात लघुउद्योगांना वाहत्या सांडपाण्यासाठी केमिकल ऑक्सिजन डिमांडची (कॉड) पातळी २५० मिलिग्रॅम इतकी आहे. त्यावर एमपीसीबीने पुनर्विचार करून ती इतर राज्याप्रमाणे वाढवावी, अशी मागणी तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने राष्ट्रीय हरित लवादाकडे केली होती. यावर राष्ट्रीय हरित लवादाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला १५ दिवसाच्या आत निर्णय घेण्याचे आदेश दिले आहे.

तळोजा औद्योगिक वसाहतीमधील अनेक उद्योग हे रासायनिक, फार्मास्युटिकल आणि पेट्रोकेमिकल क्षेत्रातील आहेत. हे उद्योग महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या तांत्रिकदृष्ट्या-दोष धोरणांमुळे अत्यंत त्रस्त आहेत. या उद्योगांमधील प्रतिनिधींनी तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनचे अध्यक्ष सतीश शेट्टी यांच्याशी संपर्क साधून यावर योग्य पाठपुरावा करण्याची मागणी केली होती.

याप्रकरणी तळोजा इंडस्ट्रीज असोसिएशनने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, पर्यावरण आणि वन मंत्रालय आणि हवामान बदल यांच्याविरुद्ध राष्ट्रीय हरित लवादाकडे कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली.

यावर राष्ट्रीय हरित लवादाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला १५ दिवसाच्या आत निर्णय घेण्याचे आदेश दिले आहे. त्यामुळे या आदेशानंतर या उद्योगांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आह. त्यामुळे त्यांना आता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ समोर त्यांची बाजू भक्कमपणे मांडण्याची संधी मिळणार आहे.

## पनवेल महापालिका क्षेत्रात महास्वच्छता अभियान

**पनवेल : प्रतिनिधी**

महाराष्ट्रभूषण डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी निमित्ताने संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रात महापालिका आणि डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. श्री सदस्य, महापालिका कर्मचारी, शासकीय अधिकारी, विद्यार्थी, नागरिकांनी यांच्या उत्स्फूर्त सहभाग घेतला. या अभियानामध्ये पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर अशा चारही प्रभागात ओला व सुका कचरा मिळून १२५ टन कचरा गोळा करण्यात आला.

अभियानामध्ये पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर अशा चारही प्रभागात १० हजार श्री समुहाचे सदस्य, आयुक्त गणेश देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहा हजार ५०० महापालिकेचे स्वच्छता निरीक्षक, स्वच्छता कर्मचारी, शाळेचे विद्यार्थी, नागरिक, शासकीय कर्मचारी असे एकुण १६ हजार ५०० नागरिकांनी या अभियानामध्ये सहभाग घेतला.



पनवेल शहरामध्ये पंचरत्न ते उरण नाका, पंचरत्न ते छत्रपती शिवाजी महाराज चौक, पंचरत्न ते भारत हॉटेल, पंचरत्न ते मिरची गल्ली, बस स्टॅन्ड विसावा हॉटेल ते जय भारत नाका, मेन हवे ब्रिज, महानगरपालिका ऑफिस ते ठाणा नाका, नवीन पनवेलमध्ये काली माता मंदिर, आदई सर्कल, सीकेटी महाविद्यालय, हनुमान मंदिर याठिकाणी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. याठिकाणी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. खांदा कॉलनीमध्ये सहाय्य आयुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या उपस्थितीत महास्वच्छता अभियान राबविण्यात आले.

खारघरमध्ये पनवेल महापालिका वॉर्ड ऑफिस, जिल्हा परिषद शाळा खारघर गाव सेक्टर १३, समाज हॉल खारघर गाव सेक्टर १३, खारघर तलाव सेक्टर १४, खारघर स्टेशन कामोठे प्रभागात आरोग्य केंद्र सेक्टर-८, कामोठे पोस्ट ऑफिस, कामोठे पोलीस स्टेशन, महावितरण ऑफिस सेक्टर -९,जिल्हा परिषद शाळा कामोठे, जिल्हा परिषद शाळा जुई, मानसरोवर रेल्वे स्टेशन, खांदेश्वर स्टेशन, कामोठे हायवे, ऐश्वर्या हॉटेल, कामोठे वॉर्ड ऑफिस, जैन पार्क ते दुधे कॉर्नर, सेंट्रल बँक, कृष्णा हॉटेल, स्मशानभूमी याठिकाणी आरोग्य निरीक्षक शैलेश गायकवाड यांच्या उपस्थितीत महास्वच्छता अभियान राबविण्यात आले. कळंबोलीमध्ये पोलिस स्टेशन, महापालिका प्रभाग कार्यालय, अग्निशमन केंद्र, सिडको कार्यालय, बसस्थानक, डीमार्ट परिसर, जुनी सुधागड शाळा, भारतीय स्टेट बँक, होल्डींग पॉण्ड रस्ता सेंट जोसेफ शाळा ते सिटी हॉस्पिटल, पोलीस निवारा केंद्र याठिकाणी महास्वच्छता अभियान राबविण्यात आले.

या वेळी पाहणी करिता आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, आरोग्य निरीक्षक अरुण कांबळे, स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे उपस्थित होते.

### *ओला व सुका १२५ टन कचरा गोळा*

***पनवेल महापालिकेच्या चारही प्रभागात ओला व सुका कचरा मिळून १२५ टन कचरा गोळा करण्यात आला. महास्वच्छता अभियानासाठी महापालिकेच्या वतीने दोन डंपर, १२ टीपर, एक जेसीबी, एक आयवा डंपर, १० घंटागाडी देण्यात आल्या होत्या. या अभियानासाठी विविध प्रभागासाठी घनकचरा आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांचे नियोजन करण्यात आले होते.***

## जासई हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचे शुभचिंतन

**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या जासई येथील श्री छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि. बा. पाटील ज्युनिअर कॉलेजमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांचा शुभचिंतन सोहळा मंगळवारी (दि. २८) झाला.

या कार्यक्रमासाठी शाळा व्यवस्थापन व विकास समितीचे अध्यक्ष आणि भारतीय मजदूर महासंघाचे राष्ट्रीय महामंत्री कामगार नेते सुरेश पाटील प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते. त्यांनी दहावीला प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. प्रमुख वक्ते म्हणून फुंडे येथी तु. ह. वाजेकर महाविद्यालय प्राचार्य पवार लाभले होते. तसेच प्रमुख पाहुणे जेएनपीटीचे असिस्टंट मॅनेजर पी. डी. पाटील होते. विद्यालयाचे प्राचार्य आणि रयत शिक्षण संस्थेचे लाईफ वर्कर अरुण घाग यांनी पाहुण्यांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.रयत सेवक संघाचे महाराष्ट्र समन्वयक नुरा शेख यांनी कार्यक्रमाचे प्रस्ताविक केले. विद्यार्थी प्रतिनिधी तृप्ती चाटे, शिक्षक प्रतिनिधी ए. एस. मोकल यांनी मनोगत व्यक्त केले. दहावीच्या विद्यार्थ्यांनी विद्यार्थ्यांसाठी भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या.



विद्यालयाचे चेअरमन अरुण जगे, व्हाईस चेअरमन डी. आर. ठाकूर, गोपीनाथ ठाकूर, रघुनाथ ठाकूर, यशवंत घरत, सुभाष घरत, जे. सी. घरत, हिराजी पाटील, रजनी घरत, महादेव म्हात्रे आदी उपस्थित होते. उप-प्राचार्या एस. एस. पाटील, पर्यवेक्षिका एस. सी. म्हात्रे तसेच सर्व सेवक वर्ग व विद्यार्थी उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस. ए. ठाकूर आणि आभार एस. ए. बाबर यांनी केले.

## महाराष्ट्र सुंदरी स्पर्धेत उरणची श्लोक पाटील प्रथम

**उरण : बातमीदार**

उरण येथील प्रख्यात सामाजिक कार्यकर्ती, कुटुंबिनी महिला मंडळाची अध्यक्षा आणि दि चाइल्ड प्रोडिगी इंटरनॅशनल प्रे स्कूलची संस्थापिका तसेच संचालिका श्लोक निखिल पाटील यांनी महाराष्ट्र सुंदरी स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकविला आहे. राष्ट्रीय साज इंटरटेनमेंटच्या आयोजिका जयश्री रगडे यांनी ताज महल हॉटेल, मुंबई येथे कॅन्सर ग्रस्त रुग्णाला मदत निधि संकलन करण्याच्या उदात्त हेतुने फैशन शो, मॉडलिंग व रोड मॉडलिंग राज्यस्तरीय महाराष्ट्र सुंदरी स्पर्धेचे आयोजन २४ फेब्रुवारी २०२३ रोजी मुंबई येथे करण्यात आले होते.



यात ३० महिला स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. पैकी केवळ पाच महिलांना विजयी घोषीत करून त्यांना प्रमुख पाहूण्या प्रसिद्ध अभिनेत्री अंकिता लोखंडे यांच्या हस्ते महाराष्ट्र सुंदरीचा मुकुट घालून सन्मान केला.

या स्पर्धेत उरणची कन्या श्लोक निखिल पाटील ही प्रथम क्रमांकाने महाराष्ट्र सुंदरीने सन्मानित झाल्याने सर्वच स्तरातून अभिनंदन व शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. श्लोकचे आई-वडिल सुमनताई तोगरे व संग्राम तोगरे यांनी श्लोकला नेहमी प्रोत्साहन दिले. त्यामुळे श्लोक यांच्यासह तिच्या आई वडिलांचेही सर्वत्र कौतुक होत आहे.

## संपादकीय

# ईशान्येत भाजपचा डंका

तीन राज्यांच्या विधानसभा निवडणुकीदरम्यान मेघालयची राजधानी शिलाँग येथे एका जाहीर सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सांगितले होते, विरोधक 'मर जा मोदी-मर जा मोदी' म्हणत आहेत, पण जनता 'मोदी तेरा कमल खिलेगा' म्हणत आहे. पंतप्रधानांची ही भविष्यवाणी खरी ठरली आहे. भाजपने त्रिपुरात पुन्हा एकदा स्पष्ट बहुमत मिळवित विजय साकारला, तर नागालँडमध्येही यश मिळविले. मेघालयात त्रिशंकू स्थिती निर्माण झाली असून नॅशनल पीपल्स पक्ष (एनपीपी) सर्वांत मोठा ठरला आहे.

**ईशान्य भारतातील त्रिपुरा, मेघालय आणि नागालँड विधानसभा निवडणुकीचा निकाल गुरुवारी जाहीर झाला. तिन्ही राज्यांत प्रत्येकी ६० सदस्यसंख्या असून विजयासाठी किमान ३१ जागा जिंकणे आवश्यक असते. त्रिपुरात १६ फेब्रुवारी, तर मेघालय आणि नागालँडमध्ये २७ फेब्रुवारी रोजी मतदान प्रक्रिया झाली होती. या राज्यांमध्ये अनुक्रमे ८८ टक्के, ७६ टक्के आणि ८४ टक्के असे भरघोस मतदान झाले. एकेकाळी ईशान्यकडच्या राज्यांमध्ये भाजप कमकुवत होता, पण पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाह यांनी ट्रेण्ड बदलला असून देशभर भाजपचा विस्तार होताना दिसत आहे. अपेक्षेप्रमाणे भाजपने मॅजिक फिगरच्या ३१हून अधिक जागांसह त्रिपुरात पुन्हा एकदा बाजी मारली. भाजपसाठी हा विजय महत्त्वपूर्ण आहे, कारण या वेळी तेथे काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष एकत्र आले होते, पण भाजप आणि आयपीएफटी आघाडीच्या झंझावातापुढे त्यांचा निभाव लागला नाही. गेल्या वेळी म्हणजेच २०१८मध्ये भाजप त्रिपुरात पहिल्यांदा सत्तेवर आला होता. डाव्यांच्या अनेक वर्षांच्या राजवटीला त्या वेळी सुरूंग लागला होता. याआधी तेथे भाजपला तुरळक यश मिळायचे, पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या संघटन कौशल्यातून पाच वर्षांपूर्वी भाजपने त्रिपुरात 'कमळ' फुलविले. त्यानंतर सलग दुसऱ्यांदा भाजपचे सरकार स्थापन होणार आहे. त्रिपुरात बंगाली तसेच आदिवासी समाज मोठ्या संख्येने आहे. त्यामुळे याचा आगामी काळात आदिवासीबहुल मध्य प्रदेश व अन्य राज्यांत भाजपला फायदा होऊ शकतो. नागालँडमध्येही भाजपने नॅशनॅलिस्ट डेमोक्रॅटिक प्रोग्रेसिव पक्षाच्या (एनडीपीपी) साथीने सत्ता मिळविली आहे. गेल्याच वर्षी एनडीपीपी आणि भाजप यांनी एकत्र निवडणूक लढविण्याची घोषणा केली होती. त्यानुसार त्यांनी संयुक्तपणे विरोधकांना धूळ चारली. येथील निवडणुकीचे एक वैशिष्ट्य म्हणजे एनडीपीपीच्या उमेदवार हेकानी जाखलू यांनी विजय मिळवून पहिली महिला आमदार होण्याचा बहुमान मिळविला आहे. मेघालयमध्ये मात्र कोणताही पक्ष स्पष्ट बहुमत मिळवू शकलेला नाही. तेथे नॅशनल पीपल्स पक्षाने (एनपीपी) सर्वाधिक जागा जिंकल्या आहेत. गेल्या वेळी याच पक्षासोबत भाजप मेघालयमध्ये सत्तेत होता. आता या वेळी एनपीपीचे नेते कोनराड संगमा काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. महाराष्ट्रातील विधानसभा पोटनिवडणुकीत संमिश्र निकाल लागला. चिंचवड मतदारसंघातून भाजपच्या अश्विनी जगताप विजयी झाल्या, तर कसबा पेठमधून काँग्रेसचे रवींद्र धंगेकर यांनी विजय मिळविला. अनुक्रमे लक्ष्मण जगताप व मुक्ता टिळक यांच्या निधनामुळे ही पोटनिवडणूक झाली होती. देशभरात निकाल काहीही लागो केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून विकासासाठी भाजप कटिबद्ध आहे.**

# आरसीएफ विस्तारित प्रकल्पाचा मार्ग मोकळा





राष्ट्रीय केमीकल्स अॅण्ड फर्टिलायझर्सच्या (आरसीएफ) अलिबाग तालुक्यातील थळ येथील प्रस्तावित मिश्र खत प्रकल्पासाठीची जनसुनावणी अखेर पूर्ण झाली त्यामुळे या प्रकल्पाचा मार्ग आता मोकळा झाला आहे. आरसीएफ प्रकल्पाच्या १४१ प्रकल्पग्रस्तांना नोकरी द्या आणि नंतरच जनसुनावणी घ्या अशी आक्रमक भूमिका प्रकल्पग्रस्तांनी घेतली. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचे कारण देत जिल्हाधिकारी कार्यालयाने ही जनसुनावणी स्थगित केली. वास्तविक आसीएफ प्रकल्प येऊन ४० वर्षे झाली. तरीदेखील या प्रकल्पाच्या प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीचा प्रश्न अजून सुटलेला नाही. त्यांना न्याय केव्हा मिळणार. आज ना उद्या नोकरी मिळेल या आशेवर प्रकल्पग्रस्तांची एका पिढीने नोकरी करण्याची वयोमर्यादा ओलांडली आहे. त्यांचे काय होणार?

देशांतर्गत मिश्र खतांची मागणी लक्षात घेऊन केंद्र सरकारने अलिबाग येथील आरसीएफ कंपनीचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला. या साठी ९१७ कोटीची गुंतवणूक केली जाणार आहे. यातून १२०० मेट्रीक टन प्रती दिवस मिश्र खत निर्मिती केली जाणार आहे. पुढील दोन वर्षात हा प्रकल्प सुरू करण्याचा कंपनीचा मानस आहे. थळ येथील कंपनीसाठी या पूर्वीच संपादीत केलेल्या जागेत प्रकल्पाची उभारणी होणार आहे. या प्रकल्पासाठी कुठलेही भुसंपादन केले जाणार नाही. त्यासठी ही जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. आरसीएफच्या या विस्तारित प्रकल्पासाठी नोव्हेंबर २०२२ महिन्यात होणारी जनसुनावणी अधिकारी गैरहजर राहील्याने रद्द करावी लागली होती. नंतर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचे कारण अधिकार्यांनी या संदर्भात पुढे केले होते. त्यामुळे २८ फेब्रुवारी रोजी ही जनसुनावणी आयोजित करण्यात आली होती. या वेळीदेखील स्थानिक प्रकल्पग्रस्तांनी आक्रमक भूमिका घेत घोषणाबाजी केली. सुनावणी रद्द करण्याची मागणी केली, परंतु सुनावणीच्या अध्यक्षस्थानी असलेल्या निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. पद्मश्री बैनाडे यांनी हे प्रकरण व्यवस्थीत हाताळून सुनावणी पूर्ण केली. त्यामुळे एक महत्त्वाचा प्रकल्प मार्गी लागला आहे. नोव्हेबर महिन्यात आयोजित करण्यात आली होती. ती रद्द झाल्यामुळे हा प्रकल्प बारगळेल. हा प्रकल्प गुजरातमध्ये जाणार अशी चर्चा सुरू झाली होती. ती चर्चा देखील आता थांबेल. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अनेकांना नोकऱ्या मिळतील. प्रकल्पग्रस्तांचे प्रश्नदेखील सुटू शकतील.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

आरसीएफ थळ प्रकल्पासाठी १९७८-७९ मध्ये भुसंपादन करण्यात आले. कंपनीसाठी २६० हेक्टर जमिन संपादीत करण्यात आली. ३८५ शेतकऱ्यांच्या जमिनी प्रकल्पासाठी संपादीत करण्यात आल्या. जिल्हा प्रशासनाकडून ३८५ कुटूंबातील एका व्यक्तीला त्याच्या शिक्षणानुसार नोकर्या देण्याचा निर्णय या वेळी घेण्यात आला. कंपनी सुरू झाल्यावर आरसीएफ प्रशासनाने ३८५ प्रकल्पग्रस्तांच्या ऐवजी १९९० पर्यंत ४५० जणांना नोकरीत समावून घेतले. त्यानंतरही प्रकल्पग्रस्तांच्या मागण्यामुळे २००४पर्यंत कंपनीने ६१७ प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेतले. हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले. तेव्हा न्यायालयाने कंपनीच्या बाजूने निकाल देतांना आता कंपनी एकाही प्रकल्पग्रस्ताला नोकरी देण्यास बांधील नसल्याचे निकालात म्हटले आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचा दाखला देत प्रकल्पग्रस्तांना कायम स्वरुपात नोकरी देणे शक्य नसल्याचे आरसीएफ व्यवस्थाचे म्हणणे आहे, मात्र कंत्राटी पध्दतीने या प्रकल्पग्रस्तांना सामावून घेण्याची तयारी दर्शवली आहे. हा प्रस्ताव प्रकल्पग्रस्तांनी सध्यातरी मान्य केलेला नाही. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नाचे भिजत घोंगडे पडले आहे.

एकाच कुटूंबाला दोन प्रकल्पग्रस्तांचे दाखले जिल्हाधिकारी रायगड कार्यालयाने जारी केल्याने हा प्रश्न निर्माण झाला. त्यामुळे प्रकल्पग्रस्तांची यादी ३८५ वरून ७५८ वर जाऊन पोहचली आहे. अजुन १४१ प्रकल्पग्रस्त कंपनीत कायमस्वरुपी नोकऱ्या मागत आहेत. हे १४१ प्रकल्पग्रस्त गेली ४० वर्षे आपल्याला प्रकल्पात नोकरी मिळावी यासाठी झगडत आहेत. त्यासाठी आतापर्यंत ५० बैठका झाल्या. अनेकवेळा आंदोलने झाली, परंतु त्यातून प्रकल्पग्रस्तांच्या हातात आश्वासनांपलिकडे काहीही पडले नाही. प्रत्येकवेळी नोकरीत घेण्याचा शब्द देण्यात आला, मात्र त्यांना नोकरी देण्यात आली नाही.

रायगड जिल्ह्यात पूर्वी प्रकल्पांना विरोध व्हायचा. आला प्रकल्प की करा विरोध अशी भूमिका स्थानिकांची असायची. त्यांना राजकीय नेत्यांचे पाठबळ मिळायचे. त्यामुळे प्रकल्प रद्द देखील झाले आहेत, परंतु आता परिस्थिती बदलत आहे. लोकांचा प्रकल्पांना विरोध नसतो. प्रकल्प येऊद्या पण त्यात नोकरी देताना स्थानिकांना प्रकल्पग्रस्तांना प्राधान्य द्या अशी त्यांची मागणी असते. आरसीएफच्या विस्तारित प्रकल्पपला शेतकऱ्यांचा विरोध नाही, परंतु प्रकल्पग्रस्तांच्या नोकऱ्यांचा प्रश्न मार्गी लावा अशी त्यांची मागणी आहे. रायगड जिल्ह्यात असे अनेक प्रकल्प आहेत जेथे जमिनी संपादीत केल्यानंतर शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडण्यात आले. त्यांच्या जमिनी गेल्या, परंतु त्यांना किंवा त्यांच्या वारसाना नोकऱ्या मिळाल्या नाहीत. त्यामुळे लोक कुणावर विश्वास ठेवायला तयार नाहित.

राजकीय इच्छाशक्तीचा आभाव, प्रकल्पग्रस्तांच्या दाखले वाटपात झालेला तांत्रिक घोळ, न्यायालयीन आदेश, कंपनीची भूमिका आणि प्रकल्पग्रस्तांचा हेकेखोरपणा यामुळे आरसीएफ प्रकल्पग्रस्तांच्या नोकरीचा प्रश्न चिघळत राहिला आहे. यातून मार्ग काढला पाहिजे. किती वर्ष हा प्रश्न रंगाळत ठेवरणार. नोकरी मिळेल या आशेवर प्रकल्पग्रस्तांची एक पिढीची नोकरी करण्याच्या वयोमर्यादेच्या पार गेली आहे. त्यामुळे जे खरच प्रकल्पग्रस्त आहेत त्यांना किंवा त्यांच्या वारसांना आरसीएफच्या विस्तारीत प्रकल्पामध्ये नोकरी मिळालीच पाहिजे. २८ फेब्रुवारी रोजी झालेल्या जनसुनावणीतदेखील स्थानिकांनी हीच मागणी लावून धरली होती.

न्यायालयाच्या आदेशानुसर आरसीएफला प्रकल्प्ग्रस्तांना विस्तारीत प्रकल्पामध्ये नोकऱ्या देणे बंधनकारक आहे. जनसुनरावणी झाल्यामुळे आरसीएफच्या विस्तारीत प्रकल्पाचा मार्ग मोकळा झाला आहे. आता कंपनीने प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या देण्याच्या न्यायलाच्या आदेशाचे पालन केले पाहिजे. प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न कायमचा सुटला पाहिजे.



## बदलते तंत्रज्ञान

### फास्ट चार्जिंगचा जगातील पहिला स्मार्टफोन लाँच

रियलमीने बार्सिलोनामध्ये सुरू असलेल्या मोबाइल वर्ल्ड काँग्रेस मध्ये आपली GT Series चा नवीन स्मार्टफोन अखेर लाँच केला आहे. Realme GT 3 चे खास वैशिष्ट्ये म्हणजे यात 240W SuperVOOC फास्ट चार्जिंग टेक्नोलॉजी दिली आहे. कंपनीचा दावा आहे की, हा फोन फक्त ९ मिनिट आणि ३० सेकंदात शून्य ते १०० टक्के पर्यंत चार्ज होतो. रियलमीने या फोनमध्ये क्वॉलकॉम स्नॅपड्रॅगन 8+ Gen १ प्रोससेर, १६ जीबी रॅमसारखे फीचर्स दिले आहेत. हँडसेटमध्ये ५० मेगापिक्सलचा ट्रिपल रियर कॅमेरा सेटअप दिला आहे. फोनमध्ये 4600mAh ची बॅटरी दिली आहे. जाणून घ्या किंमत व फीचर्स संबंधी.




**Realme GT 3 Price**

Realme GT 3 च्या ८ जीबी रॅम व १२८ जीबी स्टोरेजच्या फोनची किंमत ६४९ डॉलर म्हणजेच ५३ हजार ६०० रुपये, १२ जीबी रॅम व २५६ जीबी स्टोरेज, १६ जीबी रॅम व २५६ जीबी स्टोरेज, १६ जीबी रॅम व ५१२ जीबी स्टोरेज आणि १६ जीबी रॅम व १ टीबीपर्यंत स्टोरेज मध्ये उपलब्ध करण्यात आले आहे.

**Realme GT 3 Specifications**

रियलमीच्या या फोनमध्ये ६.७४ इंचाचा -चजडएऊडिस्प्ले दिला आहे. याचा रिझॉल्यूशन २७७२ ÷ १२४० पिक्सल आहे. स्क्रीनचा रिफ्रेश रेट १४४ हर्ट्ज आणि टच सॅम्पेलिंग रेट २६० हर्ट्ज दिला आहे. डिस्प्लेमध्ये पंच होल मध्ये सेल्फी सेन्सर दिले आहे. या स्मार्टफोनमध्ये क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ८+ Gen १ प्रोससेर दिले आहे. फोनमध्ये इंटिग्रेटेड एड्रेनो GPU मिळतो. Realme GT 3 मध्ये ट्रिपल रियर कॅमेरा सेटअप मिळतो.

फोनमध्ये ५० मेगापिक्सलया सोनी IMX890 सेंसर आणि OIS सपोर्ट मिळतो. स्मार्टफोनमध्ये हाय रिझॉल्यूशन ८ मेगापिक्सलचा अल्ट्रा वाइड अँगल लेन्स आणि २ मेगापिक्सलचा मायक्रोस्कोप लेन्स दिला आहे. सेल्फी आणि व्हिडिओ कॉलिंगसाठी १६ मेगापिक्सलचा फ्रंट सेन्सर मिळतो. फोनमध्ये 4600mAh ची बॅटरी दिली आहे. फोनमध्ये टाइप-सी चार्जिंग पोर्टद्वारे २४०W SuperVOOC चार्जिंग सपोर्ट मिळतो.

# गायक आणि संगीतकार शंकर महादेवन

अभियांत्रिकीची पदवीप्राप्त शंकर महादेवन यांनी चांगल्या पगाराची नोकरी सोडली आणि आपल्या अंगी असलेल्या संगीत कला, कौशल्याला आपला व्यवसाय बनवला. संगीताबरोबरच त्यांनी अभिनयसुद्धा केला आहे. वयाच्या पाचव्या वर्षी वीणा वाजवणारा हा बादशहा संगीतातच करिष्मा करेल हे ठाऊक असतानाही अभियांत्रिकेचे शिक्षण घेऊन सॉफ्टवेअर कंपनीत नोकरी करणारे संगीतकार शंकर महादेवन यांचा इथपर्यंतचा प्रवास खरोखर प्रेरणादायी आहे. आज त्यांचा जन्मदिन आहे. त्याबद्दल जाणून घेऊया त्यांच्याविषयी...



**निमित्त**

शंकर महादेवन यांचा जन्म ३ मार्च १९६७ मध्ये मुंबईच्या चेंबूर उपनगरात झाला. चेंबूरच्या अवर लेडी ऑफ पर्पेच्युअल सुकर हायस्कूल आणि स्वामी विवेकानंद हायस्कूलमधून त्यांचे शालेय शिक्षण झाले. त्यांनी १९८८ मध्ये रामराव आदिक इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, नवी मुंबई येथून कॉम्प्युटर सायन्स आणि सॉफ्टवेअर इंजिनीअरिंगची पदवी प्राप्त केली.

गायक, संगीतकार शंकर महादेवन हे केरळच्या पलक्कड शहरातील तमिळ अय्यर कुटुंबातील आहेत. दीपिका शृंगारपुरे या शंकर महादेवन यांच्या बहीण आहे. शंकर महादेवन यांच्या पत्नीचे नाव संगीता शंकर महादेवन आहे. शंकर महादेवन आणि संगीता एकमेकांना लहानपणापासून ओळखतात. ते १४ वर्षांचे असताना पहिल्यांदा भेटले होते. ते दोघे शेजारी राहत होते आणि एकत्र बॅडमिंटन खेळायचे. शंकर महादेवन हे एक गायक असण्यासोबतच उत्कृष्ट शेफदेखील आहे. ते थाई आणि दक्षिण भारतीय पाककृती बनवू शकतात आणि उत्कृष्ट सॅलड्स आणि सूप देखील बनवू शकतात. त्यामुळे ते जर गायक नसते तर ते एक उत्तम शेफ बनले असते असे त्यांची पत्नी संगीता सांगतात.

शंकर महादेवन यांना आईच्या गर्भातच संगीताची देण मिळाली होती बहुतेक. लहानपणीच ते एक हार्मोनियम वादक बनले होते आणि त्यांनी वयाच्या अवघ्या पाचव्या वर्षी वीणा वाजवण्यास सुरुवात केली होती. शंकर महादेवन यांनी पंडित श्रीनिवास खळे यांच्याकडून हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताचे धडे घेतले आहे. तसेच, कर्नाटक शास्त्रीय संगीतातील तज्ञ टी.आर. बालामणी यांचेही त्यांना मार्गदर्शन लाभले आहे.

संगीतकार-गायक शंकर महादेवन यांना वयाच्या ११ व्या वर्षी दिग्गज गायिका, भारतरत्न लता मंगेशकर यांच्यासोबत गाणे गाण्याची संधी मिळाली आणि त्यांनी आपल्या संगीत कारकिर्दीची सुरुवात केली. त्यांचे पहिले रेकॉर्डिंग वयाच्या ११ व्या वर्षी ''राम श्याम गुण गान'' नावाच्या अल्बमसाठी झाले होते. लता मंगेशकर आणि भीमसेन जोशी तेव्हा पहिल्यांदाच एकत्र आले आणि त्यांनी शंकर महादेवन यांना अल्बममध्ये काम करण्याची संधी दिली.

संगीत उद्योगात पाऊल ठेवण्यापूर्वी शंकर महादेवन हे ओरॅकल कॉर्पोरेशनसाठी सॉफ्टवेअर प्रोग्रामर म्हणून काम करत होते. शंकर महादेवन यांनी आपल्या संगीत कारकिर्दीची सुरुवात जाहिरातींसाठी जिंगल्स गाऊन केली. शंकर महादेवन यांनी १९९४ मध्ये आलेल्या हमसे है मुकाबला या तमिळ चित्रपटाची हिंदी आवृत्ती-कधलन चित्रपटाद्वारे गायनात पदार्पण केले, ज्यामध्ये त्यांनी पेट्टा रॅप आणि उर्वशी उर्वशी ही दोन गाणी गायली.

१९९८ मध्ये आलेल्या डुप्लिकेट चित्रपटातील तुम नहीं जाना या गाण्याने त्यांनी बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. १९९८ मध्ये, त्यांनी त्यांचा पहिला अल्बम ब्रेथलेस रिलीज केला या पहिल्याच ब्रेथलेस गाण्याने शंकर महादेवन यांना प्रसिद्धी मिळवून दिली.

२०१९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तर २८ सप्टेंबर २०११ रोजी लता मंगेशकर पुरस्कार त्यांना मिळाला. कल हो ना हो चित्रपटासाठी सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शन (शंकर-एहसान-लॉय), २००७ मध्ये तारे जमीन पर चित्रपटातील मा गाण्यासाठी सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक याशिवाय अनेक पुरस्काराचे ते मानकरी आहेत.

**-तुलना येरेकर**

(छाया : तन्वी पवार)

**क्लिक...क्लिक...!**



पनवेल : शहरातील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात केलेले सुशोभीकरण पाहण्यासाठी अनेक नागरिक भेट देत असतात.

## आरोग्य प्रहर



### लसूण का आणि कुणी खाऊ नये? जाणून घ्या

लसूण युक्त पदार्थ आरोग्यासाठी चांगले मानले जातात. लसूण मिसळल्याने भाजीची चव तर सुधारतेच, शिवाय ती आरोग्यासाठीही चांगली मानली जाते. त्याची चव उष्ण असल्याने हिवाळ्यात त्याच्या सेवनावर भर दिला जातो. हे खाल्ल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढते, ज्यामुळे हंगामी आजारांपासून बचाव होतो. पण त्याचे फक्त फायदे आहेत, असे नाही. बऱ्याच लोकांसाठी, त्याचे सेवन हानिकारक देखील बनते. आज आम्ही तुम्हाला लसणाशी संबंधित असेच काही तोटे सांगणार आहोत. जाणून घेऊया कोणत्या लोकांनी लसणाचे सेवन करू नये.

लसूण खाल्ल्याने शरीराचा रक्तदाब वाढतो. त्यामुळे ज्यांना अस्वस्थता, चक्कर येणे किंवा रक्तदाबाची समस्या आहे त्यांनी लसणाचे सेवन कमी करावे. शरीरात रक्ताची कमतरता असताना लसूण न खाण्याचा सल्ला दिला जातो.

**यकृत खराब होऊ शकते** - लसूणमध्ये अँटीऑक्सिडंट्स नावाचा घटक असतो, ज्यामुळे यकृतात विषारी पदार्थ जमा होऊ शकतात. अशा वेळी जास्त लसूण खाल्ल्याने यकृत खराब होऊ शकते. त्यामुळे त्याचे योग्य प्रमाणात सेवन करणे फायदेशीर ठरते.

**ॲसिडिटी वाढू शकते** - ज्या लोकांना वारंवार गॅस ॲसिडिटी किंवा छातीत जळजळ होण्याची तक्रार असते त्यांनीदेखील लसणाचे सेवन कमी केले पाहिजे. असे न केल्याने त्यांच्या छातीत जळजळ आणि वेदना होण्याची समस्या वाढू शकते. तसेच त्यांना खाण्यापिण्यात ही समस्या येऊ शकते.

**उलट्या आणि अतिसार** - ज्या लोकांना उलट्या आणि अतिसाराचा त्रास होत आहे त्यांनी लसूण अजिबात खाऊ नये. त्याच्या गरम चवीमुळे पोटात उष्णता आणि जळजळ होऊ शकते. ज्यामुळे तुम्हाला अस्वस्थता आणि अनेक प्रकारचा त्रास होऊ शकतो.

**चक्कर येऊ शकते** - अधिक प्रमाणामध्ये कच्ची लसूण खाल्ल्यामुळे लो ब्ड प्रेशरचा त्रास व्हायला सुरुवात होते. कमी रक्तदाबामुळे चक्कर यायला लागते. हा मुद्दा सिद्ध करणारे पुरावे उपलब्ध नसल्यामुळे हा एका प्रकारचा तर्क आहे असे म्हणता येईल.

## निवडक

### आनंददायी बाल संस्कार मेळावा



**मुरुड :** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी विविध खेळ, संस्कार वर्ग, मेळावे ह्या सर्वच प्रकारच्या गोष्टी कारणीभूत असतात. ह्याच सर्व दृषटिकोनातूनच आगरदांडा केंद्र अंतर्गत ग्राम पंचायत राजपुरी येथे आनंददायी बाल संस्कार मेळावा आयोजित करण्यात आला होता. प्रमुख पाहुणे राजपुरी सरपंच हिरकणी गिदी, अदानी फाउंडेशन वरिष्ठ प्रकल्प अधिकारी जयश्री काळे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष राजपुरी नरेंद्र घागरी, रायगड राजपुरी जिल्हा परिषद मराठी शाळा मुख्याध्यापक सुचेनी पाटील, केंद्र प्रमुख जितेंद्र मकु, मुख्याध्यापिका आगरदांडा– अलका शिंदे, मुख्याध्यापिका डोंगरी , शुभांगी नारमोड, मुख्याध्यापक मिठागर –कृष्णा पाटील, मुख्याध्यापक खामदे– निलेश भेरे, मुख्याध्यापिका नांदले– मंगला मोरे, मुख्याध्यापक टोकेखार –मंगेश शिंदे, दुर्वास घागरी, राजन गीते, युवा मंडळ, महिला मंडळ आगरदांडा, राजापुरी, डोंगरी, मिठागर, खामदे, राजापुरी, नांडले, टोकेखर येथील मराठी व उर्दू जिल्हा परिषदेच्या शाळा सहभागी झाल्या.

### आरोग्य शिबिराला प्रतिसाद



**पाली :** नागरिकांचे आरोग्य सदृढ व निरोगी राहावे यादृष्टीने सुधागड तालुक्यातील माणगाव बुद्रुक ग्रामपंचायतीच्या वतीने पनवेल खांदा येथील अष्टविनायक हॉस्पिटल व सन्मान सामाजिक विकास संस्था संयुक्त विद्यमाने माणगाव बुद्रुक ग्रामपंचायत कार्यालयात गुरुवारी (ता.२) मोफत वैद्यकीय चिकित्सा व आरोग्य तपासणी शिबीर संपन्न झाले. शिबिरात ग्रामपंचायत हद्दीतील लोकांची तज्ञ डॉक्टर व त्यांच्या टिमने ईसीजी करून हृदय तपासणी व इतर आजारांबाबत मोफत आरोग्य तपासणी केली. तब्बल १२५ जणांनी शिबिराचा लाभ घेतला. यावेळी काही रुग्णांना पुढील उपचारासाठी रुग्णालयात अधिक तपासणीसाठी बोलावण्यात येणार आहे. यावेळी सरपंच रमेश गणपत साळुंके, उपसरपंच सुवर्णा रामभाऊ आंग्रे, ग्रामपंचायत सदस्य शरद बोडके, अत्माराम दळवी, सागर साळुंके, मोरेश्वर दळवी, मनिश पालवे, कैलास फाटक, पोलीस मंगेश फाटक, संदीप देशमुख, सुषमा देशमुख सन्मान सामाजिक विकास संस्थेच्या अध्यक्षा आरती मस्करे, सचिव अमित गायकवाड तर तपासणी करिता रुपेश यादव, मार्केटिगं इनचार्ज मनिष गायकवाड, डॉ. हवाबी पठाण, डॉ. यशश्री परदेशी, मेघना चव्हाण, प्रियांका सिस्टर, प्रणाली घाडीगावकर, योगेश पवार, विशाल शिंदे, रोशनी वाजे आदि उपस्थित होते.

# टेम्पो अंगावर पडून वीटभट्टी कामगाराचा जागीच मृत्यू

## पत्नी, मुलगी देतेय मृत्यूशी झुंज

**चौक : रामप्रहर वृत्त**

दिवसभर वीटभट्टीवर अंगमेहनत करून झोपलेला संजय जाधव पहाटेच्या थंडीत टेम्पो अंगावर पडून जागीच झोपेत मरण पावला. तर पत्नी व मुलगा मृत्यूशी झुंज देत आहेत.

खालापूर तालुक्यात मौजे नडोदे हद्दीत पौद–कलोते मार्गावर वीटभट्टी असून याच मार्गावरून एमएच. ०४/ जिआर/३११६ या क्रमांकाचा आयशर टेम्पो ऑईल भरलेले बॅरल घेऊन पहाटे डोंबिवलीकडे जात असताना रस्त्याच्या कडेला वीटभट्टी कामगार यांच्यासाठी तात्पुरता निवारा घेण्यासाठी बांधलेल्या झोपडीवर पलटी झाल्याने दिवसभर कष्ट करून झोपलेला संजय अनंत जाधव (वय ३५) याचा टेम्पो अंगावर पडून जागीच मृत्यू झाला, तर पत्नी दिपाली संजय जाधव (वय ३०) व मुलगा संकेत यांचे दोन्ही पाय निकामी झाले असल्याचे समजते. त्यांना कामोठे येथे एमजीएम हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले असून दोघांची प्रकृती गंभीर आहे.

खालापुरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक युवराज सुर्यवंशी व पोलीस शिपाई महेश खंडागळे पुढील तपास करीत आहेत.



### टेम्पोचालक ताब्यात

डोंबिवलीतील टेम्पो चालक सिंवा अशोक यादव याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. टेम्पोत असलेले ऑईलचे बॅरेल कोणत्या कंपनीतून टेम्पो चालक घेऊन कुठे जात होता, ते अद्यापही समजले नाही. तसेच हा मार्ग मोठ्या रहदारीचा नाही. मग या मार्गावरून पहाटे टेम्पो कुठे जात होता याचा तपास होणे गरजेचे आहे.

# कर्जत, नेरळमध्ये महास्वच्छता अभियान

## हजारो किलो कचरा संकलित

**कर्जत : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब तथा नारायण विष्णू धर्माधिकारी यांच्या जन्मशतब्दीनिमित्त बुधवारी कर्जत, नेरळ शहर येथे महा ग्रामस्वच्छता अभियान राबविण्यात आले. यामध्ये कर्जत शहरात १२१ टन सुका कचरा तर नेरळ व नेरळ ग्रामीण भागातून सहा टन ९५० किलो सुका तर चार टन ८१० किलो ओला कचरा संकलित केला.

अभियाना मध्ये कर्जत परिसरातील १६ बैठकीतील सुमारे नऊशे सदस्य तसेच नेरळ भागातील नेरळ टेपआळी, नेरळ पायरमाळ, कोलीवली, धामोते, वारे, तळवडे, पोशिर, पाटगाव या बैठकीतील श्री सदस्यांनी सहभाग घेतला होता. या ग्राम महास्वच्छता अभियानात हजारोच्या संख्येने श्री सदस्य उपस्थित होते. प्रारंभी कर्जत नगरपरिषद परिसरात तिर्थस्वरुप डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिमेला नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी पुष्पमाला अर्पण केली.

यावेळी नगरसेविका, कर्मचारी उपस्थित होते. नेरळ ग्रामपंचायत मध्ये डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या प्रतिमेला सरपंच आणि उपसरपंचांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व महा ग्रामस्वच्छता अभियानाची सुरुवात केली.



# शिवसेनेचे श्रीवर्धनमध्ये राऊत यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोल्हापूर येथे माध्यमांशी बोलताना हे विधिमंडळ नाही हे तर चोर मंडळ आहे. ही बनावट शिवसेना आहे. आम्हाला बाळासाहेब ठाकरे आणि पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी अनेक पदे दिली आहेत. आम्ही अशी पदे ओवाळून टाकतो.आम्ही चोर व लफंगे नाही. अशा प्रकारे केलेल्या वक्तव्याचे विधानभवनात पडसाद उमटल्या नंतर खासदार राऊत यांचा राज्यभर निषेध केला जात आहे. तालुका शिवसेनेच्यावतीने श्रीवर्धन शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे राऊत यांच्या विरोधात घोषणा देत निषेध करण्यात आला. त्यांच्या प्रतिमेस जोडे मारण्यात आले.



यावेळी उपजिल्हाप्रमुख शाम भोकरे यांनी राऊत यांच्या विधानाचा निषेध करत सांगितले. हातातील सत्ता गेल्यामुळे राऊत मनोरुग्ण झाले आहेत. त्यामुळे ते हल्ली प्रसारमाध्यमां समोर काहीही बोलत असतात. त्यांना वेळीच मनोरुग्णालयात दाखल करण्याची गरज आहे.

यावेळी तालुकाप्रमुख प्रतोष कोलथरकर, भाजप तालुकाध्यक्ष प्रशांत शिंदे, शहरप्रमुख देवेंद्र भुसाणे,उपशहरप्रमुख सावन तवसाळकर, युवासेना शहरप्रमुख अजय चव्हाण, महिला शहरप्रमुख सुप्रिया चोगले, महिला उपशहरप्रमुख रविना गुरव, महिला संघटक संगीता गुरव, संतोष वेश्वीकर, शैलेश चोगले, अप्पा नरवणकर तसेच तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## वणव्यामुळे उसरोली बेलीवाडी आदिवासीवाडीतील डोंगराला आग

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील उसरोली ग्रामपंचायत हद्दीमधील बेलीवाडी आदिवासीवाडी येथील डोंगर भागाला वणव्यामुळे अनेक झाडे झुडपे भसमसात झाली आहेत. या भागाला लागूनच आदिवाडी वाडी असून येथे अनेक आदिवासी लोकांची घरे आहेत. जर या वणवा वेळीच विझवला गेला नसता तर येथील घरांना सुद्धा मोठे नुकसान सोसावे लागले असते.

बुधवार १ मार्च रोजीच्या रात्रीच्या समयी या भागाला वणव्याने वेधले त्यामुळे डोंगराच्या सभोतालच्या भागाला आगीने वेढले होते. सदरची बाब उसरोली ग्रामपंचायत सरपंच मनीष नांदगावकर याना माहिती पडताच त्यांनी तात्काळ मुरुड तहसीलदार रोहन शिंदे याना फोन लावून या वणव्याचे गांभीर्य सांगितले. तहसीलदार शिंदे सुद्धा तात्काळ या भागात पोहचून त्यांनी फणसाड अभयारण्य व प्रादेशिक विभाग याना पाचारण केले.तात्काळ हे दोन्ही विभाग पोहचुन अनेक कर्मचाऱ्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला सुमारे चार ते पाच तास आग विझवण्यासाठी गेले तेव्हा आग आटोक्यात आली आहे.

मा. गुन्नाल साहेब कोर्ट
अॅड. वृषाली वाघमारे

**पनवेल येथील दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर पनवेल**

दि. चौ. अर्ज क्र.१८९/२०२३
नि. ७/ड
ने. ता. : ०४/०४/२०२३

१) श्रीमती. शालन बाबुराव इंगोले
वय ७६ वर्षे, व्यवसाय – गृहीणी
२) श्रीमती. शकुंतला दशरथ इंगोले,
वय ४४ वर्षे, व्यवसाय – गृहीणी
३) कु. रवींद्र दशरथ इंगोले,
वय २७ वर्षे, व्यवसाय नोकरी
४) कु. विजय दशरथ इंगोले,
वय २५ वर्षे, व्यवसाय नोकरी
राहणार :– ई १/१८ / सी ६, सेक्टर १४,
नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
} अर्जदार

**विरुध्द**
कोणीही नाही

### जाहीर नोटीस

वरील अर्जदार १) श्रीमती शकुंतला दशरथ इंगोले, वय ४४ वर्षे, व्यवसाय गृहिणी, या कै. दशरथ बाबुराव इंगोले, यांच्या पत्नी आहेत. २) कु. रवींद्र दशरथ इंगोले, वय २७ वर्ष, व अर्जदार क्र. ३) कु. विजय दशरथ इंगोल, वय २५ वर्षे, ही त्यांची मुले आहेत. सर्व राहणार :– ई १ / १८ / सी ६, सेक्टर १४, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.

मयत कै. दशरथ बाबुराव इंगोले यांचे पनवेल या ठिकाणी दि. ०३/ १२ / २०२१ रोजी अपोलो– हॉस्पीटल, बेलापुर येथे निधन झाले. मयत **कै. दशरथ बाबुराव इंगोले** यांच्या निधनाची नोंद बेलापुर महानगरपालीका यांच्या अधिकाऱ्याची सही व शिक्का आहे. यांनी त्यांच्या मृत्युचा दाखला दिलेला आहे. सदर मयताचे नावे असेली मिळकत खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.क्र. | पत्ता | किंमत |
|---|---|---|
| १) | ई १ / १८ / सी ६, सेक्टर १४, नविन पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. क्षेत्र. २२.५८ चौ. मी. बिल्टअप. | रू.२,००,०००/– |

वरील मिळकतीबाबत उक्त अर्जदारांनी वारस दाखला मिळण्याकरीता अर्ज दिला आहे. यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल आणि वरील मिळकतीच्या वारस दाखल्याबाबत कोणाचे हक्क, अधिकार अथवा हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास त्याने तशी लेखी हरकत हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या मे. कोर्टात सादर करावी. दिलेल्या मुदतीमध्ये कुणाचीही हरकत न आल्यास या अर्जदारास यांचे विनंती प्रमाणे वारस दाखला दिला जाईल व त्यांनतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.
येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. ०२/०३/२०२३ रोजी माझ्या सहीने व मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही / –**
**क. लिपीक**
**दि. न्या. व स्तर पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही / –**
**सहा अधिक्षक**
**दि. न्या. व स्तर पनवेल**

# साळाव शाळेत विज्ञान दिन साजरा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

साळाव जिल्हा परिषद शाळेत राष्ट्रीय विज्ञान दिनाचे निमित्ताने विज्ञान दिन साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने विद्यगर्थ्यांनी पाठ्य पुस्तकांतील वेगवेगळ्या प्रयोगाचे प्रात्यक्षित विज्ञान प्रदर्शनात करून दाखविले.

साळाव शाळेतील विज्ञान प्रदर्शनास मान्यवरांचे हस्ते दिपप्रज्वलन, साळाव जेएसडब्लू कंपनी सिएसआर विभाग प्रमुख राम मोहिते यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. यावेळी गटशिक्षण अधिकारी बी. के. पाखरे, केंद्रप्रमुख मोहिनी पाटील, मुख्याध्यापक चंद्रकांत काटकर, साळाव ग्रा. प. सरपंच निलम पाटील, शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्षा योगिता शेट्टी, अभिता पाटील, भालचंद्र साळावकर व पालकवर्ग यांची उपस्थिती होती.

साळाव शाळेच्या पाचवी ते सातवीच्या विदयार्थ्यांनी प्रदर्शनास विविध मॉडेल्स प्रदर्शनास ठेवले होते. विदयार्थ्यांमध्ये वर्गिकरण, कार्यकारण भाव सांगता येणे, प्रयोग करणे, वैज्ञानिक दृष्टीकोन वृध्दीगत होण्यासाठी या विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित मान्यवराचे स्वागत साळाव राजिप शाळेचे मुख्याध्यापक चंद्रकांत काटकर यांनी पुष्पगूच्छ प्रदान करून केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकेत कार्यक्रमाची रूपरेषा मुख्याध्यापक चद्रकांत काटकर यांनी सांगितली.

यावेळी प्रमुख पाहूणे साळाव सिएसआर विभाग प्रमुख राम मोहिते यांनी विदयार्थ्यांना मार्गदर्शन करताना, विज्ञान दिन का साजरा करायचा ?,त्याचे महत्व काय? या विषयी विषद करताना, तुम्हाला विविध प्रश्न पडतात,त्यांची उत्तरे माहित नसतात, ते जाणून घेणे, हे काय आहे ? हे असेच का? याचा अभ्यास म्हणजे विज्ञान असा खुलासा केला. तसेच संशोधनाची आवड कशी निर्माण होते? त्याचप्रमाणे कशा प्रकारचे प्रगती होते, शास्त्रज्ञांनी लावलेले वेगवेगळे शोध, यांची माहिती उदाहरणासह त्यांनी दिली. सुत्रसंचालन विषय शिक्षिका रेश्मा धुमाळ व उपस्थितांचे आभार सहशिक्षीका प्रिती झेडेंकर यांनी व्यक्त केले.



# मध्य रेल्वे महाव्यवस्थापकांकडून रोहा स्टेशनची पाहणी

## महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाकडून विविध मागण्यांचे निवेदन

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेचे शेवटचे रेल्वे स्थानक असलेल्या रोहा रेल्वे स्थानकाला मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक नरेश लालवानी यांनी भेट देत येथे कार्यरत असलेल्या रेल्वेच्या सर्वच विभागाची पाहणी केली. यावेळी त्यांनी रेल्वे स्थानका अंतर्गत व बाहेरील परिसराची पाहणी करीत रेल्वेच्या अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

यावेळी रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक रजनीश गोयल यांसह रेल्वेचे वरिष्ठ अधिकारी, रेल्वे पोलीस चे वरिष्ठ अधिकारी, स्टेशन मास्तर उपस्थित होते.

महाव्यवस्थापक नरेश लालवानी यांनी मुंबई विभागाचे निरीक्षण सुरुवात केली आहे या निरीक्षणाची सुरुवात रोहयाहुन झाल्यानंतर नागोठणे, जिते, अपटा, पनवेल, दिवा, वसई आदी रेल्वे स्थानक व परिसराची पाहणी महाव्यवस्थापक करणार आहेत.

मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक नरेश लालवानी यांनी सकाळी साडे नऊ वाजताच्या सुमारास रोहा रेल्वे स्थानकाला भेट दिली. त्यांच्यासमवेत रेल्वेचे सर्वच विभागाचे वरिष्ठ अधिकारी



उपस्थित होते. महाव्यवस्थापक नरेश लालवाणी यांच्यासमोर विभागीय परिचलन व्यवस्थापक यांनी आपल्या विभागा विषयी सादरीकरण केले. यावेळी लालवाणी

यांनी रोहा रेल्वे स्थानकात लावलेल्या सुरक्षा स्टॉल सह रेल्वेच्या विविध विभागांनी लावलेल्या स्टॉलची पाहणी केली. उपस्थित त्या त्या विभागाच्या अधिकारी यांनी त्यांना त्यांच्या विभागात वतीने माहिती दिली.

या पाहणी दरम्यान रोहा रेल्वे स्थानकाचा परिसर, जीपीएस बेस मेंटेनन्स मॉनिटरिंग सिस्टीम, तिकिट आरक्षण कार्यालय, बोगदा, वळण, रनिंग रूम, रेल्वे स्टेशन बाहेरील परिसर, वाहन तळ, आर पी एफ कार्यालय, ट्रेनिंग कोच आदीची पाहणी केली. या सर्व परिसराची व स्टॉलची पाहणी केल्यानंतर महाव्यवस्थापक नरेश लालवानी यांनी अधिकाऱ्यांना सूचना केल्या.

यावेळी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघचे अध्यक्ष सुर्यकांत वाघमारे यांनी महाव्यवस्थापक नरेश लालवानी यांची भेट घेत त्यांचे स्वागत करीत रोहा प्रवासांच्या विविध समस्या यासह रोहा रेल्वे स्थानकात जलद गाड्यांना थांबा,नवीन गाड्या चालु करणे आदीचे निवेदन दिले. यावेळी महाराष्ट्र रेल्वे प्रवासी महासंघाचे मोहन, महादेव सरसंबे, अमोल पेणकर, नरेश कुशवाह, महेंद्र मोरे, सायली सदावर्ते, तपस्वी कडू आदी उपस्थित होते.

रोहा रेल्वे स्थानकाला महाव्यवस्थापक नरेश लालवाणी यांनी भेट दिल्याने त्यांच्याकडून रोहेकरांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. रोहेकरांना काहीतरी झुकते माप मिळेल अशी आशा रोहेकरांनी बाळगले आहे.

### पेपर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **बळीराम नागु घरत** यांचेकडून कायमस्वरुपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **बळीराम नागु घरत** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे विंधणे (५५३३२४)**
**(ULPIN ११९६१७३६६०६), तालुका – उरण, जिल्हा – रायगड**

| गट कमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २७३/१ | १ | १.५२.९०<br>पो.ख. ०.१०.३० | १९.४७ |
| | | एकुण १.६३.२० | |
| या एकूण क्षेत्रापैकी विक्रेते यांच्या हिश्याचे ०.२३.०० गुंठे | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर्ड पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३ मार्च २०२३

**सही/–**
**अॅड. निलेश बा. झंजाड**
बी–१०४ सफायर सी. एच. एस. भूखंड
क्रमांक–३३/३४, सेक्टर २२,
कामोठे, तालुका पनवेल,
जिल्हा रायगड ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१

### नमुना एन. डी.

(नियम ९२(३) पहा)
परवानाधारकाच्या उत्तराधिकाऱ्याने वृत्तपत्रात प्रसिद्ध करावयाच्या नोटीसीचा नमुना

लोकांच्या माहितीसाठी याद्वारे कळविण्यात येते की, परवाना क्र. MH46/CC/AUTO/2018/6266 मध्ये समाविष्ट असलेल्या मोटार वाहन क्र. MH46 AZ 5240 चे मालक **कै. अशोक बाबासाहेब मेटे** यांचे तारीख ०५/०९/२०२० रोजी निधन झालेले आहे.

मी आशा अशोक मेटे, पत्ता : संभाजी उडाणे, केएल–१, रुम नं. एच–११, कळंबोली कॉलनी, सेक्टर–५ई, कळंबोली नोड, कळंबोली, रायगड, पनवेल, ४१०२१८. उपरोल्लेखित वाहनाच्या कब्जाचा उत्तराधिकारी असल्यामुळे सदर परवान्याचा वापर करण्याचा माझा इरादा आहे. आणि त्यानुसार, त्या परवान्याचे माझ्या नावावर हस्तांतरण होण्यासाठी मी योग्य त्या प्राधिकरणाकडे/प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे/प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडे अर्ज केलेला आहे.

या बाबतीत कोणताही दावा सांगणाऱ्या किंवा हरकत असलेल्या कोणत्याही व्यक्तीने ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत असा दावा किंवा हरकत प्रादेशिक परिवहन कार्यालय पनवेलच्या/प्रादेशिक परिवहन प्राधिकरण कार्यालयात निदर्शनास आणून दिली पाहिजे.

**उत्तराधिकाऱ्याचे नाव – आशा अशोक मेटे**
**पत्ता– संभाजी उडाणे, केएल–१, रुम नं. एच–११, कळंबोली कॉलनी, सेक्टर–५ई, कळंबोली नोड, कळंबोली, रायगड, पनवेल, ४१०२०६.**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

### E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered SRM vendors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender / RFx No. | Description | Estimated Cost | Due Date & Time (Hrs) |
|---|---|---|---|---|
| 1 | E-Tender-4/ 22-23 **RFx No. 7000026399** | Hiring of One No. of Light Motor Vehicle for the Office of the Executive Engineer, Major Stores, Panvel for the F.Y. 2023-24. | Limited to Rs. 6 Lakh (Incl. Taxes) | 09.03.2023, 23:59 Hrs. |

**EMD:** Rs. 6,000/- **Tender Fee:** 590/- incl. GST for submission of bids.

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :** EE, Mob. No. 9769006220/DY EE. Mob. No. 9930057633
**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**Major Stores, Panvel**

# नेरूळमधील अनधिकृत झोपड्या जमीनदोस्त

## भाजपच्या पत्रव्यवहारामुळे त्वरित कारवाई



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका बी विभाग नेरूळ कार्यक्षेत्रातील भूखंड क्रमांक जी–१/७ व भूखंड क्रमांक ७/७, सेक्टर २२, नेरूळ, नवी मुंबई हा नवी मुंबई महापालिकेने सिडको प्राधिकरणाकडून हस्तांतरीत करून त्याठिकाणी उद्यान विकसीत करण्यासाठी आरक्षित केलेले आहे. तथापि या भूखंडावर एकूण १८५ पेक्षा जास्त झोपड्यांचे अतिक्रमण झालेले होते. ही बाब भाजप महिला मोर्चाच्या सरचिटणीस मंगल घरत यांनी नागरिकांसह आयुक्तांची भेट घेऊन आयुक्तांच्या लक्षात आणून दिली होती. त्यानुसार या अनधिकृत झोपड्या जमीनदोस्त करण्यात आल्या.

नवी मुंबई महापालिका उपायुक्त (अतिक्रमण) यांच्या निर्देशानुसार या भूखंडावरील संपूर्ण झोपडपट्टी, तीन पक्की घरे नवी मुंबई महापालिका अतिक्रमण विभागाकडून एक पोकलन मशिन, दोन जेसीबी मशिन व दोन डंपरच्या सहाय्याने निष्कासीत करण्यात आली. या झोपडपट्टी निर्मूलन मोहिमेवेळी नेरूळ विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी, नेरूळ, तुर्भे, घणसोली, ऐरोली विभागाकडील कनिष्ठ अभियंता (अतिक्रमण), अधिक्षक व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक तसेच नेरूळ पोलीस ठाणे येथील पोलीस निरीक्षक व पोलीस उपस्थित होते.

### ▮ अनैतिक प्रकारांना आळा

*बेकायदा झोपडपट्टीमुळे नागरिकांना होणाऱ्या या त्रासाबदल वारंवार पत्र व्यवहार व आंदोलन करूनही कारवाई होत नसल्याचे भाजप महिला मोर्चाच्या सरचिटणीस मंगल घरत यांनी निवेदनातून मांडले होते. या निवेदनाची दखल घेत कारवाई करण्यात आली. त्यामुळे या विभागातील चोऱ्या–माऱ्या, अंमली पदार्थांचा व्यवसाय करणे, वेश्याव्यवसाय अशा अनैतिक प्रकारांना आळा बसण्यास मदत होईल.*

नेरूळ बालाजी मंदिरापाठीमागील भागात उभ्या राहिलेल्या या बेकायदा झोपडपट्टीमुळे आसपासच्या नागरिकांचे राहणीमान धोक्यात आले होते. याचे प्रमुख कारण म्हणजे या अनधिकृत झोपडपट्टीमध्ये मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी नागरिकांचा भरणा होता. उजळ माथ्याने अनैतिक व्यवसाय सुरू होते.

# नवी मुंबईतील स्वच्छता कामांची महापालिका आयुक्तांकडून पाहणी



**नवी मुंबई : बातमीदार**

'निश्चय केला, नंबर पहिला' हे ध्येय वाक्य नजरेसमोर ठेवून शहर स्वच्छतेवर अधिक काटेकोर लक्ष देण्याचे नवी मुंबई महापालिकेने निश्चित केले असून त्यादृष्टीने संपूर्ण यंत्रणा कामाला लागलेली आहे. या अनुषंगाने बुधवारी (दि. १ मार्च) महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी सकाळपासून नेरूळ, तुर्भे व वाशी विभागाचा तसेच तुर्भे विभागातील एम.आय.डी.सी. क्षेत्रातील स्वच्छता कामांची प्रत्यक्ष पाहणी करीत स्वच्छतेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असे स्पष्ट निर्देश दिले.

शहरातील मुख्य रस्त्यांच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनांमुळे स्वच्छता कामात अडथळा येतो हे लक्षात घेऊन आसपासच्या सोसायट्यांमधील पदाधिकाऱ्यांना व वाहन मालकांना याची कल्पना देण्यात यावी, असे निर्देशित करतानाच जी वाहने बऱ्याच दिवसांपासून धूळ खात रस्त्याच्या कडेला उभी आहेत त्यांना नोटीस लावून ती उचलून घेण्याची कार्यवाही करावी व शहर स्वच्छतेतील अडथळा दूर करावा, असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले.

ज्याठिकाणी रस्ते, पदपथ, गटारे यांची कामे सुरू आहेत व त्याच्या खोदकामाचे ढिगारे अस्ताव्यस्त पडून आहेत त्याठिकाणचे डेब्रीज व्यवस्थितरित्या ठेवले जाईल व त्याठिकाणी ग्रीन नेट लावले जाईल याकडेही लक्ष देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. ज्या मुख्य रस्त्यांवर यांत्रिकी वाहनांव्दारे सफाई करण्यात अडचणी जाणवतात अशा ठिकाणी मनुष्यबळ लावून साफसफाई करण्यात यावी अशा स्पष्ट सूचना देत आयुक्त राजेश नार्वेकर यांनी कोणताही भाग दुर्लक्षतेमुळे अस्वच्छ राहिला अशा परिस्थितीत आढळल्यास कारवाई करण्याचे निर्देशित केले.

या दौऱ्यामध्ये माथाडी कामगार शिल्प चौक तुर्भे येथील सार्वजनिक शौचालयातील स्वच्छतेची व आवश्यक सुविधांची पाहणी करताना यासारख्या वापर जास्त असणाऱ्या शौचालयांची सुविधा नियमित राहील याबाबत तेथील केअर टेकरने व पर्यवेक्षकाने विशेष लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी दिल्या.

अशाच प्रकारे तुर्भे नाका येथील फायझर रोडवर असलेल्या सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांची पाहणी करताना त्या परिसरातील लोकसंख्या लक्षात घेऊन त्याठिकाणी सध्या तांत्रिक साधने उपलब्ध होत नसल्याने बंद अवस्थेत असलेले ई–टॉयलेट्स व शी–टॉयलेट्स तेथील तांत्रिक रचना काढून सर्वसाधारण पध्दतीने सुरू राहतील याची तातडीने अंमलबजावणी करण्याचे आयुक्तांमार्फत सूचित करण्यात आले.

शहराच्या स्वच्छ व सुंदर प्रतिमेला हानी पोहचणार नाही याची दखल नागरिकांनी घ्यावी व संबंधित महापालिका विभाग कार्यालयानेही याबाबतच्या प्रतिबंधात्मक मोहिमा नियमितपणे व तीव्रतेने राबवाव्यात असेही निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले. या वेळी परिवहन व्यवस्थापक तथा तुर्भे विभागाचे स्वच्छता नोडल अधिकारी योगेश कडुसकर, तुर्भे विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी भरत धांडे, स्वच्छता अधिकारी सुधाकर वडजे आदी उपस्थित होते.

### घनकचरा व्यवस्थापन विभागाला सूचना

***मुख्य रस्त्यांवरील काही शिल्पांवर रहदारी जास्त असल्याने धूळ बसत असून अशा शिल्पाकृती नियमितपणे स्वच्छ करण्याची कार्यप्रणाली आखून द्यावी तसेच शिल्पे दुरुस्त करून घ्यावी असेही आयुक्त राजेश नार्वेकर यांनी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांना सूचित केले.***

**नवी मुंबई शहर नियमित स्वच्छ रहावे ही बांधिलकी जपत नवी मुंबई महानगरपालिका काम करीत असून येथील जागरुक नागरिकांच्या संपूर्ण सक्रीय सहभागाशिवाय हे शक्य नाही. प्रत्येक नवी मुंबईकर नागरिकाने आपल्या घरातील कचरा ओला, सुका व घरगुती घातक अशा तीन प्रकारे वेगळा करावा व महापालिकेकडेही वेगवेगळा द्यावा. घरातील कचरा उघड्यावर रस्त्यात टाकून शहर अस्वच्छतेची कृती करू नये.**

**–राजेश नार्वेकर,**
**आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# फुंडे हायस्कूलमध्ये विज्ञान दिन साजरा



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर माध्यमिक विद्यालयात मंगळवारी (दि. २८) राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. विज्ञान दिनानिमित्त विद्यालयात विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

प्राचार्या सुनिता वर्तक, पर्यवेक्षक एस. जी. म्हात्रे, विज्ञान मंडळ प्रमुख साधना पाटील, सुजाता गावंड, आर. जी. शेळके आणि सर्व शिक्षक यांनी नोबेल पुरस्कार प्राप्त, थोर भारतीय शास्त्रज्ञ सी. व्ही. रामण यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. तदनंतर विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. पाचवी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची वैज्ञानिक उपकरणे, मॉडेल्स प्रदर्शनात मांडली होती. सूर्यमाला, होम मेड फॅन, गण, एअर, लँड, वॉटर ट्रान्सपोर्ट, जल शुद्धीकरण, वॉटर डिस्पेन्सर, ट्रॅक्टर, सोलर पॅनेल, ड्रोन, सिसमोग्राफी इत्यादी मॉडेल्सचे प्रदर्शन भरविण्यात आले होते.

एस. एस. घोडके आणि व्ही. डी. पाटील यांनी विज्ञान प्रदर्शनाचे परीक्षण करून गट निहाय प्रथम तीन क्रमांक काढले. सातवी ब च्या वर्गाने विज्ञान प्रदर्शनाच्या सभेचा कार्यक्रम सादर केला. वैभवी ठाकूर, स्नेहल खडतरे या विद्यार्थिनींनी विज्ञान दिनाविषयी माहिती सांगितली. तर विज्ञान शिक्षक एस. डी. म्हात्रे यांनी रामण इफेक्ट् आणि विज्ञान दिन याची माहिती आपल्या भाषणातून दिली. तर विज्ञान मंडळ प्रमुख साधना पाटील यांनी विज्ञान पोवाडा सादर केला व सर्व विद्यार्थ्यांना विज्ञान प्रतिज्ञा दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत पाटील तर आभार एच. एन. पाटील यांनी मानले.

# प्रशांत पाटील यांचे उपोषण तात्पुरते स्थगित

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

घणसोली येथील साई सदानंद नगर व समर्थ नगर येथे अनधिकृत इमारती उभ्या केल्या जात आहेत. या इमारतीवर निष्काषणाची कारवाई करण्यात यावी, अशी मागणी भाजपचे माजी नगरसेवक प्रशांत पाटील यांनी केली होती. यासंदर्भात त्यांनी सिडको व पालिका प्रशासन यांच्याकडे पत्रव्यवहार करून उपोषणाचा इशारा दिला होता.

दरम्यान, घणसोली विभाग अधिकारी तथा सह आयुक्त संजय तायडे यांनी पाटील यांना लेखी पत्र पाठवून सिडको व पालिका यांची या बाबत चर्चा झाली असून लवकरच या अनधिकृत इमारतीवर कारवाई करण्यात येईल असे लेखी कळवले. त्यामुळे उपोषण तात्पुरते स्थगित करीत असल्याचे प्रशांत पाटील यांनी सांगितले.

# वीर वाजेकर कॉलेज विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट



**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभाग व निवडणूक साक्षरता मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि. २८) आयोजित कोप्रोली येथील ग्रामपंचायत, आदिवासी वाडी येथील अभ्यास सहल (क्षेत्रभेट) विविध उपक्रमांच्या माध्यमातून यशस्वीरित्या झाली.

राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉक्टर संदीप घोडके यांच्या संकल्पनेतून आणि प्राचार्य डॉ. प्रल्हाद पवार यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी या अभ्यास गटाने कोप्रोली येथील प्राथमिक आरोग्य केंद्र, आदिवासी वाडी व ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी अभ्यास सहल आयोजित केली होती. यामध्ये व्यसनाधीनतेच्या द्वारे शरीराची हानी व कुटुंबाची दुर्दशा होत असते हे व्यसनमुक्ती जनजागृतीच्या माध्यमातून विविध घोषणा देऊन गेल्या तसेच निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार मतदानाची टक्केवारी वाढवण्याकरिता व लोकशाही सुदृढ व्हावी या हेतूने मतदार जागृती रॅली विविध घोषणांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी पूर्ण केली.

आदिवासी पाड्यांमध्ये शैक्षणिक, आरोग्यविषयक व मूलभूत गरजांच्या संदर्भात या अभ्यास गटाने सर्वेक्षण केले.

सभेमध्ये प्रा. डॉ. संदीप घोडके यांनी उपस्थितांना मुंबई विद्यापीठ प्रकल्प, शासनाचे मतदार साक्षरता संदेश व सर्वेक्षण याबाबत मार्गदर्शन केले. क्षेत्र भेट यशस्वी करण्यासाठी स्मिता माळी, हर्षवर्धन जाधव, सुप्रिया म्हात्रे, क्रिती, धीरज पाटील व विवेक म्हात्रे यांनी विशेष प्रयत्न केले.

# 'भारत रक्षा मंच'ची मीडिया प्रकोष्ठ कार्यकारिणी जाहीर

**खारघर : रामप्रहर वृत्त**

भारत देशाला अखंड हिंदुराष्ट्र बनविण्याची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी, प्रयत्नशील असणाऱ्या 'भारत रक्षा मंच' या प्रखर हिंदुत्ववादी संघटनेच्या राष्ट्रीय मिडिया प्रकोष्ठची कार्यकारिणी जाहीर झाली आहे. दिल्लीच्या छत्तरपुरमध्ये झालेल्या भारत रक्षा मंचच्या राष्ट्रीय मिडिया प्रकोष्ठ संमेलनात देशाच्या विविध राज्यांतील विविध भाषिक पत्रकार सहभागी झाले होते.

ज्यामध्ये, महाराष्ट्र ठाणे जिल्ह्यातील नवी मुंबईचे पत्रकार तथा पालिका प्रशासन वृत्तसमूहाचे मुख्य संपादक सुदीप घोलप यांची राष्ट्रीय कार्यकारणीत सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आली आहे. या वेळी, भारत रक्षा मंचचे उद्दिष्ट आणि त्याअंतर्गत होणाऱ्या कार्यक्रमांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्यासाठीची प्रमुख जबाबदारी मिडिया प्रकोष्ठची आहे.

तर, प्रकोष्ठचे राष्ट्रीय संयोजक म्हणून हरिहर रघुवंशी तर कार्यकारणी सदस्य पदावर पत्रकार सुदीप घोलप, अंबुज तिवारी, संदीप गुप्ता, प्राणप्रतिम पाल, ब्रुजेश उपाध्याय, सुयश मिश्रा यांची नियुक्ती भारत रक्षा मंचचे संस्थापक सूर्यकांत केळकर गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच, कार्यकारी अध्यक्ष सेवानिवृत्त कमांडर डॉ. भूषण दिवाण, राष्ट्रीय संघटन मंत्री प्रशांत कोतवाल, राष्ट्रीय मंत्री शशांक चोपडा व रूपेश कुमार, महिला संगठन प्रमुख बिना जयेश गोगरी इत्यादींच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली.

# शाहू महाराज विद्यालयात विज्ञान दिनी व्याख्यान



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका संचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आंबेडकर नगर, रबाळे (नवी मुंबई) येथे मंगळवारी (दि. २८) राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त चमत्कारा मागील विज्ञान हे नवी मुंबई अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते अशोक निकम यांचे व्याख्यान प्रात्यक्षिक व प्रयोगासह सादरीकरण विद्यार्थ्यांच्या समोर करण्यात आले.

तत्पूर्वी माजी महापौर सुधाकर सोनवणे मुख्याध्यापक अमोल खरसंबळे, मुख्याध्यापिका रंजना वनशा यांच्यासह सर्व शिक्षक वृंद यांच्या हस्ते लोकराजा छत्रपती शाहू महाराज व सी. व्ही. रामण यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी शाळेच्या स्वच्छता दूत असलेल्या रत्ना जाधव यांचा सेवानिवृत्त झाल्याबद्दल सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक अनिसचे सक्रिय कार्यकर्ते व क्रीडाशिक्षक अमोलकुमार वाघमारे यांनी केले. अनिसचे सक्रिय कार्यकर्ते व नवी मुंबई कार्याध्यक्ष अशोक निकम यांनी विद्यार्थ्यांच्या सहभागासह प्रात्यक्षिक करून दाखवले. शेवटी आभार विज्ञान शिक्षक संतोष कारंडे यांनी मानले.

सूत्रसंचालन रबाळे शाखा कार्याध्यक्ष अविनाश जाधव यांनी केले. कार्यक्रमाचे संपूर्ण संयोजन दिलीप निंबारा, ब्रिजलाल ठाकरे, विनोद झापडे, दीपक कटरे, अविनाश जाधव, कल्पना नाफडे, गीता घाडी यांनी केले कार्यक्रमास आठवी व नववीचे ४३० विद्यार्थ्यासह शिक्षक कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# उरण येथे कविसंमेलन रंगले



**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

महाराष्ट्र राज्य भाषा दिन व कवी कुसुमाग्रज वि. वा. शिरवाडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून मराठी भाषेचा प्रचार, प्रसार व्हावा व मराठी भाषेविषयी प्रेम आपुलकी निर्माण व्हावी, मराठी भाषेविषयी जनजागृती व्हावी या अनुषंगाने श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्था व कोकण मराठी साहित्य परिषद शाखा उरण यांच्या संयुक्त विद्यमाने उरण शहरातील विमला तलाव गार्डन येथे सोमवारी (दि. २७) मराठी कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.

कविसंमेलनावेळी कवी सूर्यकांत दांडेकर, चंद्रकांत मुकादम, मारुती तांबे, एल बी पाटील, भ. पो. म्हात्रे, राम म्हात्रे, अजय शिवकर, संजय होळकर, संग्राम तोगरे, मनोज ठाकूर, जयवंत पाटील, दौलत पाटील, केसरीनाथ ठाकूर, रामचंद्र म्हात्रे आदि कवींनी मराठी भाषेत कविता, गाणे, चारोळी, गझल गाऊन मराठी भाषेचा इतिहास, भाषेचा महत्त्व प्रतिपादित केले. प्रत्येक कवींनी अतिशय सुंदर आवाजात कविता गाऊन रसिक प्रेषकांची मने जिंकली. या वेळी प्रत्येक कवी व ज्येष्ठ नागरिकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. सामाजिक व साहित्यिक क्षेत्रात विशेष उल्लेखनीय कार्य केलेल्या अॅण्ड गोपाळ शेळके, संजय होळकर, केसरीनाथ ठाकूर, संग्राम तोगरे, दिनानाथ कोळगावकर या मान्यवरांना प्रमाणपत्र, गुलाब पुष्प देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्री छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुदेश पाटील, सदस्य सादिक शेख, आकाश पवार, ओमकार म्हात्रे, अक्षय कांबळे, निकिता पाटील, सानिका पाटील, तेजस सनस आदींनी मेहनत घेतली. एकंदरीत मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित कवी संमेलनाला चांगला प्रतिसाद लाभला.

# 'अभाविप'चा नवी मुंबईत विद्यार्थी मेळावा



**नवी मुंबई : बातमीदार**

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) नवी मुंबईच्या वतीने मंगळवारी (दि. २८) इको स्तोत्र या शीर्षकाखाली विद्यार्थी मेळावा घेण्यात आला. हा पर्यावरणपूरक कार्यक्रम वाशी येथील विष्णूदास भावे नाट्यगृहात झाला.

नवी मुंबई शहरातील एकूण १७ महाविद्यालयांतून १०२९ विद्यार्थी, विद्यार्थिनी यांनी कार्यक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद देत उपस्थित राहिले. सनवी मुंबई हे पर्यावरण पूरक शहर आहे. येथील प्रशासनाकडून सातत्याने विविध पर्यावरण विषयक संकल्पना राबविल्या जातात यालाच साथ देत अभाविपने नवी मुंबईतील तरुणाई कडून पर्यावरणाविषयी जागरूकता आणि पर्यावरणस्नेही जीवनशैलीचा अंगीकार व्हावा यासाठी हा कार्यक्रम आयोजित केला होता.

या कार्यक्रमास माजी खासदार संजीव नाईक, अभाविप राष्ट्रीय कार्यकारिणी वि.नि. सदस्य व प्रमुख वक्ते प्रा. वरदराज बापट, थिंक इंडिया राष्ट्रीय सह संयोजिका आकांक्षा वराडे, अभाविप नवी मुंबई अध्यक्ष प्रा. नीळकंठ बिजलगावकर, जिल्हा सहसंयोजिका प्राची सिंग उपस्थित होते.

अभाविपतर्फे आयोजित पर्यावरणपूरक या विषयावरील स्पर्धांचे बक्षीस वितरण झाले. प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रकांचे वितरणही या वेळी करण्यात आले.

वाचाल तर वाचाल!
जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

**वाचाल तर वाचाल हे नवे सदर दर महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी 'दैनिक राम प्रहर'च्या अंकात वाचा. या सदरात वाचा निवडक साहित्यिकांनी वाचलेल्या पुस्तकांविषयीचे रसग्रहण.**

**येत्या रविवारी, ५ मार्च २०२३ रोजी वाचूया इक्बाल शर्फ मुकादम यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.**

## निवडक

### श्रीसदस्यांकडून महास्वच्छता अभियान



**खोपोली, खालापूर :** महाराष्ट्र भूषण तीर्थरुप डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडातर्फे थोर निरूपणकार डॉक्टर नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दी वर्षपूर्ती निमित्ताने संपूर्ण खोपोली शहरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. स्वच्छता मोहिमेत हजारो श्री सदस्याने सहभाग घेतला होता. प्रतिष्ठान तर्फे अनेक सामाजिक उपक्रम सातत्याने राबवले जातात. जवळपास ३९ टन कचरा यावेळी गोळा करण्यात आला. तो वीस किलोमीटर लांबीच्या रस्त्याची दुतर्फा साफसफाई श्री सदस्यांनी केली. त्यामध्ये तीस टन सुका तर नऊ टन ओला कचरा संकलित करण्यात आला. खोपोली शहरातील उर्दू शाळा, जनता विद्यालय, नगरपरिषद रुग्णालय, पोलीस ठाणे, शिळफाटा येथील बस स्थानक, खोपोली गावातील बस स्थानक परिसरात श्री सदस्यांनी स्वच्छता मोहीम राबवली. या स्वच्छता मोहिमेसाठी खोपोली नगरपरिषद प्रशासनाचे देखील सहकार्य लाभले. परिसराचा कायापालट झालेला पाहावयास मिळाला.

### आधार कार्ड अपडेटचे आवाहन

**चौक :** आधारकार्ड धारकांसाठी डॉक्युमेंट अपडेट हे नवीन फिचर विकसित झाल्याने नागरिकांनी आधारकार्ड अद्ययावत करुन घ्यावे असे आवाहन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे. २०१५ पासून देशामध्ये युनिक आयडेंटिफिकेशन अथॉरिटी ऑफ इंडिया यांच्यामार्फत देशातील नागरिकांना आधारकार्ड देण्यात येते. बायोमेट्रिक प्रमाणिकरणासह रहिवाशाची ओळख पटविण्यासाठी आधारकार्ड हा ओळखीचा सर्वात व्यापकपणे स्वीकारला जाणारा पुरावा आहे. नागरिकांकडून अनेक शासकीय सेवांचा लाभ घेण्यासाठी आता आधारकार्डचा वापर केला जात आहे. यापुढे शासकीय व इतर सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आपले आधारकार्ड अद्ययावत करुन घेणे आवश्यक आहे. ज्या नागरिकांना आधारकार्ड मिळाले आहे,परंतु दहा वर्षांमध्ये एकदाही अद्ययावत केले नाही, अशा आधारकार्ड धारकांना 'डॉक्युमेंट अपडेट' हे नवीन फिचर विकसित करण्यात आले आहे. अशा नागरिकांनी ओळखीचा पुरावा (झजख) आणि रहिवासी पुरावा (झज-) कागदपत्रे अद्ययावत करून त्यांचा आधार अद्ययावत करणे आवश्यक आहे. ज्या नागरिकांना 'डॉक्युमेंट अपडेट' करण्याचे आहे त्यांनी ॠ-रवहररी (ऑनलाईन) पोर्टलद्वारे किंवा तालुक्यातील कोणत्याही आधार नोंदणी केंद्राला भेट देऊन आपले आधारकार्ड अद्ययावत करुन घ्यावे, असे आवाहन खालापूर तहसीलदार आयुब तांबोळी यांनी केले आहे.

### मराठी भाषा दिन साजरा



**खोपोली :** आपली मायबोली मराठी भाषा आणि तिच्या विविध बोली यांचे जतन व संवर्धन करून भाषा आणि बोलींच्या संशोधनकार्यात युवा पिढीने पुढाकार घ्यावा. आपली संस्कृती, मातृभाषा, तिच्या विविध बोली यांचा सर्वांगीण अभ्यास करण्याची जबाबदारी आपलीच आहे. मराठी भाषा गौरव दिनी हा संकल्प नव्या पिढीने करावा, असे आवाहन लक्ष्मी शालिनी महिला महाविद्यालय पेझारी (अलिबाग) येथील मराठी विभागाचे प्राध्यापक व बोलींचे संशोधक डॉ.भटू वाघ यांनी विद्यार्थी- विद्यार्थिनींना केले. खोपोलीच्या के.एम.सी. महाविद्यालयात मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'मराठी भाषा गौरव दिन' या कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, उपाध्यक्ष संजय पाटील, कार्यवाह किशोर पाटील, महाविद्यालय विकास समितीचे उपाध्यक्ष राजेश अभाणी, प्राचार्य प्राध्यापक डॉ.प्रताप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत काव्यवाचन, निबंध लेखन, सुंदर हस्ताक्षर लेखन स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. स्पर्धेतील विजेत्यांना 'ग्रंथभेट व प्रमाणपत्र' देऊन गौरविण्यात आले.

# सुधागडच्या ताडगाव ग्रामपंचायतीचा कारभार भाड्याच्या खोलीतून

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील ताडगाव ग्रामपंचायत कार्यालयाची इमारत पूर्णपणे कोलमडली आहे. पावणे तीन वर्षांपूर्वी झालेल्या निसर्ग चक्रीवादळामुळे हे कार्यालय कोसळले आहे. आजतागायत येथे कोणतीही नवीन इमारत न बांधता भाड्याच्या अवघ्या दोन खोल्यांमध्ये ग्रामपंचायतचा कारभार सुरू आहे. त्यामुळे येथे कामानिमित्त येणारे ग्रामस्थ, येथील कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांची खूप गैरसोय होत आहे.

सुरुवातीला जिल्हा परिषद शाळेतून ग्रामपंचायतचा कारभार सुरू होता. त्यावेळी कोरोनामुळे शाळा बंद होत्या. मात्र शाळा सुरू झाल्यावर गावातील एका घरातील दोन खोल्या भाड्याने घेऊन तिथे ग्रामपंचायतचा कारभार सुरू आहे.

ग्रामपंचायत मार्फत जिल्हा परिषद उपमुख्य कार्यकारी अधिकारी, तत्कालीन जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती, जिल्हाधिकारी व पाली-सुधागड पंचायत समिती कार्यालयाकडे ग्रामपंचायत कार्यालय इमारत बांधून देण्यासंदर्भात विनंती अर्ज केले आहेत. शिवाय ग्रामपंचायत मासिक सभेत ठराव सुद्धा घेण्यात आला होता. मात्र याकडे आजतागायत कोणीही लक्ष दिलेले नाही. यामुळे येथील व आजूबाजूच्या गाव आणि वाड्यातील ग्रामस्थ, कर्मचारी व लोकप्रतिनिधी अक्षरशः हतबल झाले आहेत. नक्की दाद कोणाकडे मागावी हा प्रश्न त्यांना पडला आहे.



**ग्रामपंचायत कार्यालय हे गावातील पहिले घर असते, मात्र या घराची अशी दुरवस्था होणे आणि याकडे शासन प्रशासनाने दुर्लक्ष करणे हे खेदजनक आहे. यामुळे गावची शोभा लोप पावत आहे. शासनाने लवकर येथे सुसज्ज व सोईसुविधांनी युक्त इमारत बनवून द्यावी.**

**-सचिन साठे**, ग्रामस्थ, ताडगाव

**कार्यालय दुरुस्ती व नवीन कार्यालय बांधून देण्यासंदर्भात ग्रामपंचायत मार्फत संबधीत सर्व शासकीय अधिकारी व कार्यालयांना वारंवार पत्रव्यवहार करण्यात आला आहे. नुकताच पदभार स्वीकारल्यावर यासंदर्भात मी सुद्धा पाठपुरावा करत आहे.**

**-करुणा साठे**, सरपंच, ताडगाव

## फौजी असल्याची बतावणी करून चौलमध्ये ४३ हजारांचा घातला गंडा; गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

फौजी असल्याची बतावणी भ्रमणध्वनीव्दारे करून वीस टक्के कमिशनच्या आमिषाने फोन पे च्या माध्यमातून चौलमधील कॉटेज धारकास तब्बल ४३ हजार रूपयांचा आर्थिक चुना लावून फसवणूक केल्याची घटना घडली आहे. याबाबत रेवदंडा पोलिसांकडे तक्रारी नुसार माहिती तंत्रज्ञानाव्दारे आर्थिक फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चौल तुलाडदेवी येथील कॉटेज धारक ५५ वर्षीय अनिल महादेव नाईक यांना भ्रमणध्वनीव्दारे १७ फेब्रुवारी रोजी दुपारचे सुमारास कॅप्टन विकास पटेल व सुभाषचंद्र फौजी (दोन्ही राहणार कोल्हापूर) या नावाने भारतीय सैनेत फौजी म्हणून कार्यरत असून सहा इसमाकरीता तिन रूम भाड्याने मिळविण्यासाठी संपर्क केला तसेच त्यांनी ओळखपत्र व स्मार्ट कार्ड पाठवून अनिल नाईक यांना पाठवून त्याचा विश्वास संपादन केला. यावेळी त्यांनी आर्मीकार्यालयाकडून २० टक्के डिस्काउंट रूम भाड्याने मिळते अशी बतावणी करून फोन पे ॲप ओपन करण्यास सांगितले.

पैसे आगाऊ भरायचे असल्याचे सांगून फोन पे व्दारे प्रथम रूपये १४ हजार ४०० रक्कम मागवून तुमची रक्कम परत पाठवितो अशी बतावणी केली, त्यानंतर त्यांनी पुन्हा रूपये २८ हजार ६०० रक्कम मागितली, असे एकूण ४३ हजार रूपये फोन पे व्दारे परत देण्याची बतावणी करून मागविले. त्यानंतर फौजी कॅप्टन विकास पटेल व सुभाषचंद्र फौजी यांचा कोणताही संपर्क होत नसल्याने अज्ञाताने बनावट नावाने आर्थिक फसवणूक केल्याचे अनिल महादेव नाईक यांचे लक्षात येताच, त्यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली आहे.

याबाबत रेवदंडा पोलिसानी आर्थिक फसवणूकीबाबत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलीस निरिक्षक देविदास मुपडे हे करत आहेत.

## रोह्यात श्रीसदस्यांकडून स्वच्छता अभियान; २५.९ टन कचरा जमा

**रोहे, धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्म शताब्दीपुर्ती निमित्त डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्यावतीने व पद्मश्री डॉ. श्री अप्पासाहेब धर्माधिकारी व श्री सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी रोहा शहरातील सरकारी कार्यालयांचे आवार व शहरातील प्रमुख रस्त्यांची साफसफाई करण्यासाठी स्वच्छता अभियान सकाळी आठ ते साडे अकरा वाजेपर्यंत श्री सदस्यांकडून राबविण्यात आले.

डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्यावतीने सातत्याने समाज उपयोगी उपक्रम राबविण्यात येत असतात. प्रतिष्ठानच्यावतीने रक्तदान शिबिर, स्वच्छता अभियान, नदीतील गाळ काढणे, आरोग्य शिबिर, वृक्षारोपण व संवर्धन यास अन्य समाज उपयोगी उपक्रम राबवत असतात. याच अनुषंगाने महाराष्ट्र भूषण डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जन्मशताब्दीपुर्ती निमित्त डॉ. श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्यावतीने बुधवारी रोहा नगरपालिका हद्दीतील सरकारी कार्यालय व संपूर्ण रस्ते यांची स्वच्छता करण्यात आली. रोहा शहरातील १४ सरकारी कार्यालय, शहरातील संपूर्ण रस्ते, बस स्थानक व रेल्वे स्थानक येथे स्वच्छता अभियान राबवण्यात आले.

या स्वच्छता अभियानामध्ये श्री सदस्यांचा व इतर व्यक्तींचा उत्स्फूर्त प्रतिसाद दिसून आला एकूण ११३९ श्री सदस्यासह सरकारी अधिकारी व कर्मचारी या स्वच्छता अभियानात सहभागी झाले होते. या स्वच्छता अभियानास दिवानी न्यायाधीश एस. एस. महाले, प्रांताधिकारी ज्ञानेश्वर घुटवड, उपवनसंरक्षक आप्पासाहेब निकत, नगरपरिषद मुख्याधिकारी डॉ. धीरज चव्हाण, नायब तहसीलदार राजेश थोरे, रोहा रेल्वे स्टेशन प्रबंधक अजय कुमार मीना, सार्वजनिक बांधकाम शाखा अभियंता मकरंद घाडगे,एस.टी आगार प्रमुख सोफिया मुल्ला यास ६० अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. स्वच्छता अभियान राबवीत असताना एकूण २५.९ टन कचरा गोळा करून रोहा डम्पिंग ग्राउंड येथे नेण्यात आले.



## महामार्गावर खालापूर-कलोतेदरम्यान वणवा; आगीचे कारण शोधणे गरजेचे

**चौक : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय महामार्गावर खालापूर व कलोते गावच्या हद्दीवर भर दुपारी वणवा लागून त्याने रौद्र रूप धारण केले होते. या मार्गावरून ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या वाहनांना धोका निर्माण होऊ शकतो.

सद्या खालापूर तालुक्याला वणवा लागण्याचे ग्रहण लागले आहे. मागील चार दिवसात चार वणवे लागून जिवीत हानी झाली नसली तरी आर्थिक नुकसानी बरोबर पर्यावरणाची हानी होऊन जनजीवन विस्कळित होऊ लागले आहे. प्राणीमात्रात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या वणव्यात पर्यावरण प्रेमींनी लागवड केलेली झाडे, जमिनीच्या पोटात असणारे जीव आगीच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. तर शेतकरी, फार्महाऊसवाले यांनी लावलेल्या फळांच्या बागा यांनीही हानी पोहचत आहे. भटक्या जनावरांचा चारा जळून नष्ट होत आहे. त्यामुळे गुरांच्या पोटात प्लास्टिक सापडल्यास नवल नाही. आज भर दुपारी कलोते हद्दीत हॉटेल ऋषभच्या बाजूला वणवा पेटवण्यास सुरूवात झाली. कडाक्याच्या उन्हात आणि सुकलेल्या गवताने पेट घेण्यास सुरूवात केली. बघता बघता हा वणवा खालापूर हद्दीत खदानपर्यंत गेला.

राष्ट्रीय महामार्गावरून जाणाऱ्या वाहनांना याची मोठी भीती आहे. एखाद्या ज्वलनशील पदार्थाच्या गाडीने पेट घेतल्यास भोपाळ होण्यास वेळ लागणार नाही. या आगी का लावण्यात येतात याचे कारण शोधणे आवश्यक आहे असे अनेकांना वाटत आहे. वनविभाग खालापूर यांनी यावर ठोस कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.




## चौक बाजारपेठ कात टाकतेय!

### अनधिकृत बांधकामधारकांना बजावली अंतिम नोटीस

**चौक : रामप्रहर वृत्त**

खालापूर तालुक्यातील चौक बाजारपेठ कात टाकत आहे. येथील अनधिकृत बांधकाम असणारे स्वतः हून बांधकाम काढत असल्याचे चित्र दिसत आहे. तर ग्रामपंचायत तिसरी आणि अंतिम नोटीस बजावत आहे.

खालापूर तालुक्यात ग्रामीण भागात असलेली चौक बाजारपेठ चाळीस गावातील व्यापारी व ग्राहकांची बाजारपेठ म्हणून ओळख निर्माण केलेली बाजारपेठ आहे. सतत ग्राहकांची वर्दळ असलेली ही बाजारपेठ अनधिकृत बांधकामांचे माहेरघर झाले आहे. त्यामुळे येथील ग्राहक वर्गाने या बाजारपेठेला पाठ करून कर्जत व पनवेल येथील डी मार्टला अधिक पसंती दिल्याचे बोलके चित्र निर्माण होत आहे. याचा वेळीच धोका लक्षात आल्यावर तत्कालिन सार्वजनिक बांधकाम विभाग कर्जतचे सहाय्यक अभियंता सर्वगोड यांनी नियमानुसार बाजारपेठेमधील सर्व दुकान, घरे, इमारतीची मोजमाप करून ग्रामपंचायत चौक यांच्या सहाय्याने जागेच्या खूना करून बांधकाम हटविण्याबाबत कारवाई सुरू केली होती.



रस्त्याच्या मध्यावरून दोन्ही बाजूस सात मिटरची मर्यादा आखून दिलेली होती. यामुळे प्रत्येक घर दुकान बाधित होणार होते. पण बाजारपेठ मोकळी झाली असती. सन २०१८ साली निघालेली नोटीस राजकीय प्रवासात अडकून पडली. कुणाला मतांचे गणित, कुणाला अनधिकृत बांधकामांची वसुली, कुणाला कार्यकर्त्यांची काळजी तर काहींना स्वतःची काळजीत ही नोटीस पुन्हा २०२३ पासून प्रवासाला सुरुवात करत आहे. विद्यमान सरपंच रितु ठोंबरे यांनी आपल्या सहकाऱ्यांसह चौक बाजारपेठ साफ, स्वच्छ व अनधिकृत मुक्त करण्याचा चंग बांधला आहे. सुमारे १६० लोकांना अंतिम नोटीस बजावण्यात आली आहे. अनेक तात्पुरत्या अनधिकृत बांधकाम असणाऱ्यांनी स्वतः अनधिकृत कामे हटविण्यात सुरूवात केली आहे, मात्र ज्यांचा पायाच अनधिकृत बांधकाम म्हणून आहे, त्यांच्यावर काय कारवाई होते. हे पाहणे गरजेचे आहे. चौक शहराचा विकास, येथील ग्राहक याच बाजारपेठेत यावा हा आपला हेतू आहे, असे सरपंच म्हणाल्या.

**बाजारपेठेतील वाहतूक कोंडी सोडविण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न असल्याचे सांगून यात कुठलाही वाईट हेतू नाही.**

**-रितू ठोंबरे, सरपंच, चौक**

## रोह्यात मोतीबिंदू शिबिराला प्रतिसाद

### १२० जणांची तपासणी; ३४ रुग्णांच्या शस्त्रक्रिया

**धाटाव, रोहे : प्रतिनिधी**

रोहा येथील नेत्ररुग्ण तपासणी शिबिरात बुधवारी १२० रुग्णांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३४ रुग्णांना बुधवारी आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. गेल्या ९ महिन्यांत रोहा सिटिझन फोरम ट्रस्टच्या माध्यमातून तब्बल ५६४ नेत्ररुग्णांना नवी दृष्टी मिळाली आहे.



रोहा सिटिझन फोरम ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, नवीन पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेण्यात आले. रोह्याचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांच्या मंदीर सभागृहात झालेल्या या शिबिरात अल्पदरात चष्मे वाटप, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. हॉस्पिटलचे टिम मॅनेजर प्रकाश पाटील, डॉ क्रिझन, अक्षता पार्टे, श्वेता, स्नेहा, सुदामा, सिल्पेश साटम आदींनी रुग्णांची तपासणी केली.

रोहा सिटिझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितीन परब, प्रदिप देशमुख, मिलिंद अष्टिवकर, दिलीप वडके, श्रीकांत ओक, अहमदशेठ दर्जी, उस्मानभाई रोहेकर, संतोष खटावकर, महेश सरदार, संदीप सरफळे, इल्यास डबीर, दिनेश जाधव, शैलेश रावकर, सचिन शेडगे, परशूराम चव्हाण, अमोल देशमुख, प्रशांत देशमुख, निलेश शिर्के, सिद्धेश ममाले, दिनेश मोहिते, समिधा अष्टिवकर, भावेश अग्रवाल, बिलाल मोर्बेकर आदी फोरमच्या सदस्यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली. रोहा सिटीझन फोरम ट्रस्टचे अध्यक्ष नितिन परब यांनी सहयोगी संस्थांचे आणि शिबिरासाठी परिश्रम घेणाऱ्यांचे आभार मानले.

## आरसीएफमध्ये नोकरभरती; ऑनलाइन परीक्षेसाठी मार्गदर्शन

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेडमधील नियोजित कर्मचारी भरतीसाठी घेण्यात येणार्या ऑनलाइन परीक्षेसंबंधी रायगड जिल्ह्याचे रहिवासी असणाऱ्या अनुसूचीत जाती-जमाती, इतर मागासवर्गीय, आर्थिकदृष्ट्या दुर्बल, दिव्यांग आणि अनारक्षित गटांतील पात्र उमेदवारांना मार्गदर्शन लाभावे यादृष्टीने 'भरतीपूर्व जागरूकता कार्यक्रम २ ते ३ मार्च रोजी सकाळी ८.३० ते संध्या. ५.३० या दरम्यान आरसीएफ सभागृह, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स शेजारी सरखेल कान्होजी आंग्रेनगर (आरसीएफ वसाहत), कुरुळ, अलिबाग येथे आयोजित करण्यात आला आहे.

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेड या भारत सरकारच्या सार्वजनिक उपक्रमात कर्मचारी भरतीसंबंधी जाहिरात विविध वृत्तपत्रे तसेच आरसीएफचे संकेतस्थळ www.rcfltd.com या वर प्रसिद्ध झाली होती. या जाहिरातीला प्रतिसाद देऊन ऑनलाइन अर्ज केलेल्या रायगड जिल्ह्यातील उमेदवारांसाठी ऑनलाइन परीक्षेच्या स्वरूपासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी विशेष मार्गदर्शन सत्र आरसीएफ लिमिटेड, थळ युनिटतर्फे आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात ऑनलाइन परीक्षेच्या संदर्भातील मार्गदर्शनासोबत संबंधित विषयांच्या तज्ज्ञ अधिकार्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ उपस्थित उमेदवारांना होईल. याव्यतिरिक्त स्पर्धात्मक परीक्षा विषयीचे खास तज्ज्ञ उमेदवारांना दोन दिवस विशेष प्रशिक्षण देतील.

भरती संबंधीत मार्गदर्शन सत्राचे वेळापत्रक उमेदवारांना त्यांनी ऑनलाइन अर्जात नमूद केलेल्या इ-मेल आयडीवर कळविण्यात आले आहे. संबंधीत उमेदवारांनी ईमेलची प्रत (हार्ड किंवा सॉफ्ट कॉपी) तसेच आधार कार्ड (प्राधान्याने)/पॅन कार्ड/ ड्रायविंग लायसेन्सची छायाप्रत सोबत घेऊन त्यांना नेमून दिलेल्या वेळेत आरसीएफच्या कुरुळ वसाहतीमधील स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स शेजारील सभागृहात उपस्थित रहावे आणि मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आरसीएफचे मानव संपदा मुख्य व्यवस्थापक विनायक पाटील यांनी केले आहे.

# टीम इंडियाचे पुन्हा लोटांगण

**ऑस्ट्रेलियासमोर ७६ धावांचे माफक आव्हान**




**इंदोर : वृत्तसंस्था**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील इंदोर येथील कसोटी सामन्यात खेळपट्टी फिरकी गोलंदाजीसाठी अनुकूल पाहायला मिळाली. आधी इंग्लंडचे सहा गडी बाद झाल्यावर भारताचा संपूर्ण संघही १६३ धावांत गारद झाला आहे. आता ऑस्ट्रेलियाला विजयासाठी केवळ ७६ धावा करायच्या आहेत.

तिसऱ्या कसोटी सामन्यातील दुसऱ्या दिवशीदेखील गोलंदाजांचं वर्चस्व दिसून आले. आधी इंग्लंडचे ६ गडी बाद झाल्यावर भारताचा संपूर्ण संघही १६३ धावांत गारद झाला आहे. ज्यामुळे आता ऑस्ट्रेलियाला विजयासाठी केवळ ७६ धावा करायच्या आहेत.

सामन्यात पहिल्या दिवशी भारतीय संघाला अवघ्या १०९ धावांत 'कांगारूं'नी सर्वबाद केले. त्यानंतर पहिल्या दिवशी एकूण चार आणि दुसऱ्या दिवशीचा खेळ सुरू झाल्यावर उर्वरित सहा विकेट्स घेत भारताने १९७ धावांत ऑस्ट्रेलियाला रोखले. ८८ धावांची पिछाडी घेऊन मैदानात उतरलेला भारत १६३ धावाच करू शकला. पुजाराच्या ५९ धावांमुळे भारताने किमान इतकी धावसंख्या केली.

दुसरीकडे ऑस्ट्रेलियाकडून नॅथन लायनने तब्बल आठ, तर मिचेल स्टार्क आणि मॅथ्यू कुहनेमनने प्रत्येकी एक विकेट घेतली. भारत सर्वबाद झाल्यावर दुसऱ्या दिवशीचा खेळ संपला असून आता तिसऱ्या दिवशी ७६ धावांचा पाठलाग करण्यासाठी ऑस्ट्रेलिया मैदानात उतरणार आहे.

## अश्विनने मोडला कपिल देवचा विक्रम

**▪ भारताच्या यशस्वी गोलंदाजांच्या यादीत तिसऱ्या स्थानी**

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा ऑफस्पिनर रविचंद्रन अश्विनने इंदूरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळल्या जात असलेल्या तिसऱ्या कसोटी सामन्यात मोठी कामगिरी केली. अश्विनने भारतीय संघाचा माजी कर्णधार आणि महान अष्टपैलू कपिल देव यांचा विक्रम मोडला. भारताच्या सर्वांत यशस्वी गोलंदाजांच्या यादीत तो तिसऱ्या क्रमांकावर पोहचला आहे.

अश्विनने ऑस्ट्रेलियाचा फलंदाज पीटर हँड्सकॉम्बला श्रेयस अय्यरच्या हाती झेलबाद करताच कपिल देवच्या विक्रमाशी बरोबरी केली होती. त्यानंतर त्याने यष्टिरक्षक फलंदाज ॲलेक्स कॅरीला एलबीडब्ल्यू आऊट करून त्याने कपिल यांना मागे टाकले. त्याचबरोबर भारतासाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक विकेट घेणारा तिसरा गोलंदाज ठरला आहे.

आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये हरभजन सिंग आणि अनिल कुंबळे सध्या अश्विनच्या पुढे आहेत. अश्विनने आतापर्यंत ६८९ विकेट्स घेतल्या आहेत. हरभजनने ७०७ विकेट्स, तर अनिल कुंबळेने ९५३ विकेट्स घेतल्या आहेत. कपिलच्या नावावर ६८७ विकेट आहेत, ज्या त्यांनी ३५६ सामन्यात घेतल्यात.



भारताचा अनुभवी ऑफस्पिनर आर अश्विनने कसोटी क्रिकेटमध्ये ४६६ विकेट्स घेतल्या आहेत, तर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याच्याकडे १५१ विकेट्स आहेत. त्याचवेळी गेल्या वर्षी टी-२० विश्वचषकात दिसलेल्या अश्विनने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये ७२ विकेट घेतल्या आहेत. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये त्याच्या विकेट्सची संख्या ६८९ झाली आहे.



**मुंबई : एमसीए अर्थात मुंबई क्रिकेट असोसिएशन आयोजित भास्कर ट्रॉफी स्पर्धेत उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील आयथिंक स्पोर्ट्स क्रिकेट कोचिंग क्लबचा खेळाडू धैर्य किशोर पाटील याने अष्टपैलू खेळी केली. धैर्यने १२ वर्षाखालील गटातील सामन्यात खेळताना फलंदाजीमध्ये ६३ चेंडूंत २२ चौकारांनिशी १२६ धावा केल्या, तर गोलंदाजीत तीन षटकांमध्ये १९ धावा देत दोन गडी बाद केले.**

## राष्ट्रीय कराटे स्पर्धेत महाडच्या खेळाडूंची दमदार कामगिरी

**महाड : प्रतिनिधी**

पुणे धायरी येथे चॅम्पियन्स कप आमंत्रित राष्ट्रीय कराटे स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत महाड येथील चॅम्पियन्स कराटे क्लबच्या ५१ खेळाडूंनी सहभाग घेत २६ सुवर्ण, १६ रौप्य आणि १९ कांस्य अशा एकूण ६१ पदकांची कमाई केली.

यशस्वी विद्यार्थी शिहान संतोष मोहिते तसेच सेन्साई प्रसाद सावंत यांच्याकडे कराटेचे प्रशिक्षण घेतात. या स्पर्धेत १० वर्षाखालील मुलांमध्ये यश साळवी याने कुमिते या प्रकारात चॅम्पियन ऑफ चॅम्पियन ट्रॉफी आणि स्कॉलरशिप प्राप्त केली. १४ वर्षाखालील मुलींमध्ये श्रावणी कोंडविलकर हिने कुमिते, काता या दोन्ही प्रकारांमध्ये चॅम्पियन ऑफ चॅम्पियन ट्रॉफी आणि स्कॉलरशिप प्राप्त केली.

१७ वर्षाखालील मुलांमध्ये शिलदीप गायकवाड यानी कुमीते या प्रकारात चॅम्पियन ट्रॉफी आणि स्कॉलरशिप प्राप्त केली. सीनियर कॅटेगिरी मुलींमध्ये तेजस्वी वाळंज हिने कुमिते या प्रकारात



(छाया : महेश शिंदे)

चॅम्पियन ऑफ चॅम्पियन ट्रॉफी आणि स्कॉलरशिप प्राप्त केली. खुशी वर्तक, दक्षिल शेठ, श्रावणी कोंडविलकर, अभिनील राजभोज, विहान कदम ,काव्य कदम समीक्षा पाटील, यश साळवी, ओम सावंत, दुर्वेश थरवळ, मोहित विश्वकर्मा, तृप्ती खरडेकर, कृष्णा चव्हाण, शिलदीप गायकवाड, तेजस्वी वाळंज यांनी सुवर्णपदक पटकाविले.

अनय बोरसे, तेहजीब बाली, किमया कुंटे, दक्षिल शेठ, आरव शिंदे, जिजा जोशी, पारस पाटील, आर्यन मोरे, यश तासगावकर, प्रांजल पवार, आराध्या कांबळे, वेदस्व पवार यांनी रौप्यपदक प्राप्त केले, तर राणू मंडल, सुरज पवार, गतीक चव्हाण, नील शेठ, नैतिक शेडगे, वैष्णवी गोडबोले, स्वराज साळवी, स्वरा गोंधळी, चिन्मय पाटील, अर्णव कांबळे यांना कांस्यपदक मिळविले.

## तिहेरी उडीपटू ऐश्वर्या बाबूवर चार वर्षांची बंदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताची आघाडीची तिहेरी उडीपटू ऐश्वर्या बाबूवर राष्ट्रीय उत्तेजक प्रतिबंधक संस्थेच्या (नाडा) शिस्तपालन समितीने चार वर्षांची बंदी घातली आहे. गेल्या वर्षी राष्ट्रीय स्पर्धेदरम्यान घेण्यात आलेल्या चाचणीत ऐश्वर्याने 'ओस्टारीन' या बंदी घातलेल्या उत्तेजक द्रव्याचे सेवन केल्याचे निष्पन्न झाले होते.

ऐश्वर्याला १३ फेब्रवारी रोजी 'नाडा'च्या शिस्तपालन समितीकडून बंदीचे पत्र मिळाले होते. या बंदीला आव्हान देण्यासाठी तिच्याकडे ६ मार्चपर्यंतचा कालावधी आहे.

२५ वर्षीय ऐश्वर्या गेल्या वर्षी बर्मिंगहॅम येथे झालेल्या राष्ट्रकुल स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणार होती, परंतु जागतिक उत्तेजक प्रतिबंधक संस्थेने (वाडा) बंदी घातलेले उत्तेजक द्रव्य शरीरात आढळल्याने ऐश्वर्या आणि धावपटू एस. धनलक्ष्मी यांना राष्ट्रकुल स्पर्धेसाठीच्या भारतीय चमूतून वगळण्यात आले होते.

गेल्या वर्षी १३ व १४ जूनला चेन्नई येथे झालेल्या आंतरराज्य अजिंक्यपद राष्ट्रीय स्पर्धेदरम्यान ऐश्वर्याची चाचणी घेण्यात आली होती. या स्पर्धेत ऐश्वर्याने तिहेरी उडीमध्ये सुवर्णपदकाची कमाई करतानाच १४.१४ मीटर अंतराचा राष्ट्रीय विक्रम रचला होता. उत्तेजक सेवनात दोषी आढळल्यामुळे गेल्या वर्षी जुलैमध्येच ऐश्वर्यावर तात्पुरती बंदी घालण्यात आली होती. त्यामुळे चार वर्षांच्या बंदीपैकी तिचा सहा महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे.

## उमेश यादवने केला अनोखा विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**



भारताचा वेगवान गोलंदाज उमेश यादवने तिसऱ्या कसोटीच्या दुसऱ्या दिवशी मिचेल स्टार्कला त्रिफळाचीत करून देशात आपले १०० कसोटी बळी पूर्ण केले. भारतातर्फे अशी कामगिरी करणारा तो १३वा गोलंदाज ठरला. यादवने ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटीत ५० बळीही पूर्ण केले. अशी कामगिरी करणारा तो ११वा भारतीय गोलंदाज ठरला.

यादवने भारतात ३१ कसोटींमध्ये १०० गडी बाद घेतले. घरच्या भूमीवर १०० कसोटी गडी बाद करणारा तो भारताचा पाचवा वेगवान गोलंदाज ठरला. उमेशच्या आधी कपिल देव, जवागल श्रीनाथ, झहीर खान आणि इशांत शर्मा हे पराक्रम करू शकले आहेत.

वडिलांच्या निधनानंतर यादवने संघात पुनरागमन केले व इंदोर कसोटीच्या दुसऱ्या दिवशी ऑस्ट्रेलियन फलंदाजांची पळता भुई थोडी केली.

उमेश यादवने ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या इंदोर कसोटीच्या पहिल्या डावात पाच षटके टाकली आणि एका निर्धाव षटकासह ११ धावांत तीन बळी टिपले. उजव्या हाताच्या वेगवान गोलंदाजाने प्रथम कॅमेरॉन ग्रीनला (२१) एलबीडब्ल्यू आऊट केले. यानंतर त्याने मिचेल स्टार्कला (१) क्लीन बोल्ड केले. यादवचा हा भारतातील १००वा कसोटी बळी ठरला. यानंतर त्याने टॉड मर्फीला क्लीन बॉलिंग देत आपला १०१वा बळी पूर्ण केला. मर्फीला खातेही उघडता आले नाही.

**षटकारांमध्ये विराटशी बरोबरी**

दरम्यान, उमेश यादवने भारतीय संघासाठी सर्वाधिक कसोटी षटकार मारणाऱ्यांमध्ये युवराज सिंग (२२) आणि रवी शास्त्री (२२) यांना मागे टाकले. या यादीत सध्या विराट कोहली आणि यादव प्रत्येकी २४ षटकारांसह बरोबरीवर आहेत.

## माजी फुटबॉलपटू फॉन्टेन यांचे निधन

**पॅरिस : वृत्तसंस्था**

फ्रान्सचे माजी दिग्गज फुटबॉलपटू, १९५८च्या विश्वचषक स्पर्धेत विक्रमी १३ गोल झळकावणारे जस्ट फॉन्टेन यांचे बुधवारी निधन झाले. ते ८९ वर्षांचे होते.




स्वीडन येथे झालेल्या १९५८ सालच्या विश्वचषक स्पर्धेसाठी फॉन्टेन यांचा अखेरच्या क्षणी फ्रान्सच्या संघात समावेश करण्यात आला होता. मोरोक्कोमध्ये जन्मलेल्या फॉन्टेन यांचा त्या वेळी फारसा नावलौकिक नव्हता, परंतु या स्पर्धेच्या सहा सामन्यांत त्यांनी १३ गोल झळकाविले आणि एका विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत सर्वाधिक गोलचा विक्रम आपल्या नावे केला. आघाडीपटू फॉन्टेन हे आपल्या वेगासाठी आणि गोल करण्याच्या क्षमतेसाठी ओळखले जायचे. फॉन्टेन यांनी कारकीर्दीत एकूण २१३ सामन्यांत २०० गोल केले, तर तर फ्रान्ससाठी त्यांनी २१ सामन्यांत ३० गोल झळकाविले.

## इराणी चषक क्रिकेट स्पर्धेत यशस्वी जैस्वालचे द्विशतक

**ग्वाल्हेर : वृत्तसंस्था**

इराणी चषकाच्या सामन्यात शेष भारताचा खेळाडू यशस्वी जैस्वालने शेष भारतविरुद्धच्या सामन्यात द्विशतक झळकाविले. त्याला साथ देताना सलामीवीर अभिमन्यू ईश्वरनने शतक केले.

ग्वाल्हेर येथे होत असलेल्या या सामन्यात शेष भारताचा कर्णधार मयांक अगरवालच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष होते, मात्र त्याला केवळ दोन धावांवर आवेश खानने माघारी पाठवले. यानंतर तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीला आलेला यशस्वी (२५९ चेंडूंत २१३ धावा) आणि ईश्वरन (२४० चेंडूंत १५४) यांनी अप्रतिम फलंदाजी केली. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी ३७१ धावांची भागीदारी रचली. यशस्वीने आपल्या द्विशतकी खेळीत ३० चौकार आणि तीन षटकारांची, तर ईश्वरनने शतकी खेळीत १७ चौकार आणि दोन षटकारांची आतषबाजी केली.



ईश्वरनने आपले शतक पूर्ण करण्यासाठी १३५ चेंडू, तर यशस्वीने १५७ चेंडू घेतले. यानंतर डावखुऱ्या यशस्वीने धावांची गती वाढवली. यशस्वीने पुढील १०० धावा केवळ ७३ चेंडूंतच फटकाविल्या.

## एनएमपीएलमध्ये कोपरखैरणेची सानपाडावर मात

**ठाणे : प्रतिनिधी**

दादोजी कोंडदेव स्टेडियमवर शेवटपर्यंत रंगलेल्या साखळी सामन्यात कोपरखैरणे टायटन्सने सानपाडा स्कॉर्पियन्सचा १० धावांनी पराभव केला आणि माझगाव क्रिकेट क्लब आयोजित मुंबई क्रिकेट असोसिएशन मान्यतेच्या पहिल्या नवी मुंबई प्रीमियर लीग-एनएमपीएल क्रिकेट स्पर्धेत दुसऱ्या साखळी सामन्यात पहिल्या विजयाची नोंद केली.

आदित्य पवार, अरुण यादव यांची फलंदाजी आणि सर्व गोलंदाजांच्या प्रभावी कामगिरीमुळे कोपरखैरणे संघाचा विजय सुकर झाला. ४५ धावांत सात फलंदाज माघारी परतले असतानाही सानपाडा संघाच्या तळाच्या फलंदाजांनी प्रतिस्पर्ध्यांना विजयासाठी झुंजण्यास शेवटपर्यंत भाग पाडले. गोलंदाज सर्फराज इम्तियाझ शेखला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.




प्रथम फलंदाजी करतांना कोपरखैरणे टायटन्सचे खाते उघडण्यापूर्वीच सलामी जोडी धावबादद्वारे चौथ्या चेंडूवर फुटली. तरीही न डगमगता आदित्य पवार (३२ चेंडूंत ४७ धावा, चार षटकार व तीन चौकार) व अरुण यादव (३३ चेंडूंत ३५ धावा, एक षटकार व एक चौकार) यांनी सानपाडा संघाविरुद्ध मर्यादित २० षटकांमध्ये कोपरखैरणे संघाला आव्हानात्मक आठ बाद ११७ धावसंख्या उभारून दिली. फिरकी गोलंदाज आशितोष माळी (१७ धावांत दोन बळी) व रोषण जाधव (१६ धावांत दोन बळी) यांनी छान गोलंदाजी केली. आवाक्यात विजयी लक्ष्य असतानाही सानपाडा संघाची फलंदाजी सात बाद ४५ धावा अशी ढेपाळली.

तळाचे फलंदाज सोनू जैस्वार (१९ चेंडूंत २३ धावा, एक षटकार व दोन चौकार), तुषार चाटे (सहा चेंडूंत १४ धावा, दोन षटकार) व बद्रे आलम (१३ चेंडूंत २० धावा, एक षटकार व दोन चौकार) यांना अधिक वेळ खेळपट्टीवर टिकू न देण्यात मध्यमगती गोलंदाज कुणाल नवरंगे (१४ धावांत दोन बळी), फिरकी गोलंदाज सर्फराज इम्तियाझ शेख (२० धावांत दोन बळी) व सैफ शेख (१८ धावांत दोन बळी) यशस्वी ठरले. परिणामी सानपाडा संघाला १८.१ षटकांमध्ये १०७ धावसंख्येवर गुंडाळत कोपरखैरणे टायटन्सने चुरशीचा १० धावांनी पहिला विजय संपादन केला.

### ठाण्याचा मीरा भाईंदरवर विजय

दुसऱ्या दुसऱ्या सामन्यात सामनावीर तनुश कोटियन व श्रीराज घरत यांच्या धडाकेबाज नाबाद अर्धशतकी फलंदाजीमुळे ठाणे टायगर्सने मीरा भाईंदर लायन्सवर ४४ धावांनी विजय मिळविला. या सामन्यात मीरा भाईंदरचा फिरकी गोलंदाज अंकित चव्हाणने (१५ धावांत तीन बळी) ठाणे टायगर्सची अवस्था तीन बाद २४ धावा अशी नाजूक करूनही श्रीराज घरत (४४ चेंडूंत नाबाद ६३ धावा, दोन षटकार व पाच चौकार) व तनुश कोटियन (५६ चेंडूंत नाबाद ७७ धावा, दोन षटकार व आठ चौकार) यांनी चौथ्या विकेटसाठी ९८ चेंडूत १४३ धावांची अभेद्य भागीदारी केली. त्यामुळे ठाणे टायगर्सने रचलेले तीन बाद १६७ धावांचे लक्ष्य प्रतिस्पर्ध्यांना पेलवले नाही. अष्टपैलू तनुश कोटियन (१७ धावांत तीन बळी) याच्यासह प्रमुख पाच गोलंदाजांनी विकेट घेणारी अचूक गोलंदाजी करून मीरा भाईंदर लायन्सचा डाव १८.१ षटकामध्ये १२३ धावांवर संपुष्टात आणला आणि ठाणे टायगर्सने ४४ धावांच्या फरकाने पहिला साखळी विजय नोंदविला.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com